Bid cum Application Forms can be obtained from the Registered and Corporate Office of **JIO PLATFORMS LIMITED**, **Tel**: +91 22 7967 0000; BRLMs: **Kotak Mahindra Capital Company Limited,** Telephone: +91 22 4336 0000**; Morgan Stanley India Company Private Limited,** Telephone: +91 22 6118 1000**; BofA Securities India Limited,** Telephone: +91 22 6632 8000**; Axis Capital Limited,** Telephone: +91 22 4325 2183**; BNP Paribas,** Telephone: +91 22 3370 4000**; Citigroup Global Markets India Private Limited,** Telephone: +91 22 6175 9999**; CLSA India Private Limited,** Telephone: +91 22 6650 5050**; DAM Capital Advisors Limited,** Telephone: +91 22 4202 2500**; Goldman Sachs (India) Securities Private Limited,** Telephone: +91 22 6616 9000**; HDFC Bank Limited,** Telephone: +91 22 3395 8233**; HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited,** Telephone: +91 22 6864 1289**; ICICI Securities Limited,** Telephone: +91 22 6807 7100**; IIFL Capital Services Limited,** Telephone: +91 22 4646 4728**; Jefferies India Private Limited,** Telephone: +91 22 4356 6000**; JM Financial Limited,** Telephone: +91 22 6630 3030**; J.P. Morgan India Private Limited,** Telephone: +91 22 6157 3000**; SBI Capital Markets Limited,** Telephone: +91 22 4006 9807**; UBS Securities India Private Limited,** Telephone: +91 22 6155 6000**; and 360 ONE WAM Limited,** Telephone: +91 22 4031 7000**; Syndicate Members: HDFC Securities Limited** Tel: +91 2230753400, **Investec Capital Services (India) Private Limited** Tel: + 91 2268497400, **JM Financial Services Limited** Tel: +91 22 6136 3400, **Kotak Securities Limited** Tel: +91 2242858484, **SBICAP Securities Limited** Tel: +91 22 6943 2521, **Sharekhan Limited** Tel: +91 22 6750 2000, **360 ONE Capital Market Private Limited** ***(Formerly known as Batlivala & Karani Securities India Private Limited)*** Tel: + 91 022 40317000 / +91 022 40076000 **and 360 ONE Distribution Services Limited** Tel: 9321332882 and at the select locations of the Sub-syndicate Members (as given below), SCSBs, Registered Brokers, RTAs and CDPs participating in the Issue. Bid cum Application Forms will also be available on the websites of BSE and NSE and the Designated Branches of SCSBs, the list of which is available at websites of the Stock Exchanges and SEBI.

Sub-Syndicate Members:

Almondz Global Securities Ltd, Ambit Capital Limited, Ambit Private Limited, Amrapali Capital & Finance Services Limited, Anand Rathi Share & Stock Brokers Limited, Anand Share Consultancy, ANS Pvt Limited, Asit C Mehta Financial Services Limited, Asit C Mehta Investment Intermediates Limited, Axis Securities Limited, Bajaj Financial Securities Limited, Bob Capital Markets Limited, Centrum Broking Limited, Centrum Capital Advisors Limited, Centrum Finverse limited, Centrum Wealth Management Ltd, Choice Equity Broking Private Limited, Dalal & Broacha Stock Broking Pvt Limited, DB(International) Stock Brokers Ltd, Eureka Stock & Share Broking Services Ltd, G Raj & Co. (Consultants) Limited, Globe Capital Market Limited, IDBI Capital Market Services Limited, Inga Ventures Pvt Ltd, Innovate Securities Pvt Limited, Intensive Fiscal Services Private Limited, Jhaveri Securities, Jobanputra Fiscal Services Private Limited, Kalpataru Multiplier Limited, Kantilal Chhaganlal Securities Pvt.Ltd, Keynote Capitals Limited, KJMC Capital Market Services Limited, Lakshmishree Investment & Securities Pvt Limited, LKP Securities Limited, Marwadi Shares & Finance Ltd, Mehta Equities Limited, Monarch Networth Capital Limited, Motilal Oswal Financial Services Limited, Motilal Oswal Securities Limited, Nextbillion Technology Private Limited, Nirmal Bang Securities Pvt Limited, Nuvama Wealth and Investment Limited (Edelweiss Broking Limited), Nuvama Wealth Management Limited, Pantomath Financial Services Limited, Patel Wealth Advisors Pvt Limited, Paytm, Prabhudas Lilladher Pvt Limited, Pravin Ratilal Share & Stock Brokers Limited, Religare Broking Limited, Religare Securities Limited, Rikhav Securities Ltd, RR Equity Brokers Private Limited, SMC Global Securities Limited, Standard Chartered Securities, Sundae Capital, Sunidhi Securities & Finance Ltd, Sushil Financial Services Pvt. Ltd., Systematix Shares & Stocks (India) Limited, Tanna Financial Services, Tradebulls Securities Private Limited, Trust Securities Limited, Viren M Shah, YES Securities (India) Limited, Zerodha

Escrow Collection Banks: Axis Bank Limited and ICICI Bank Limited

Refund Banks: Axis Bank Limited and ICICI Bank Limited

Public Issue Account Banks: Kotak Mahindra Bank Limited and State Bank of India

Sponsor Banks: Axis Bank Limited, ICICI Bank Limited, Kotak Mahindra Bank Limited and State Bank of India

UPI: UPI Bidders can also bid through UPI mechanism

Jio Platforms Limited has provided a toll free number to address any queries related to the Issue.

Toll free number: 1800 309 4001

You may also address your queries related to the Issue by typing **'Hi'** or **'Hello'** on

WhatsApp to 7977222222

For JIO PLATFORMS LIMITED
On behalf of the Board of Directors

Sd/-
Ms. Savithri Parekh
Company Secretary

Place : Mumbai, Maharashtra
Date : October 20, 2026

All capitalised terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them In the RHP.

Jio Platforms Limited is proposing, subject to receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its Equity Shares and has filed the RHP with RoC on October 14, 2026. The RHP is made available on the website of SEBI at www.sebi.gov.in, on the websites of the Stock Exchanges, i.e. BSE at www.bseindia.com and NSE at www.nseindia.com, on the website of the Company at www.jio.com and on the respective websites of the BRLMs. Any potential investors should note that investment in equity shares involves a high degree of risk, and for details relating to such risk, please see the section titled "**Risk Factors**" on page 30 of the RHP. Potential investors should not rely on the DRHP filed with SEBI and the Stock Exchanges for making any investment decision and should instead rely on the RHP, as filed with the RoC, for making investment decisions.

This announcement is not an offer of securities for sale in the United States or elsewhere. This announcement has been prepared for publication in India only and is not for publication or distribution, directly or indirectly, in or into the United States. The Equity Shares offered in the Issue have not been and will not be registered under the U.S. Securities Act of 1933, as amended (**"U.S. Securities Act"**) or any state securities laws in the United States, and unless so registered, may not be offered or sold within the United States, except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act and applicable state securities laws in the United States. Accordingly, the Equity Shares are being offered and sold (i) in the United States solely to "qualified institutional buyers" (as defined in Rule 144A under the U.S. Securities Act) in transactions exempt from, or not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act, or (ii) outside the United States in "offshore transactions," as defined in, and in reliance on Regulation S under the U.S. Securities Act and the applicable laws of the jurisdictions where such offers and sales occur. There will be no public offering of Equity Shares in the United States.

वाईटावर सत्याचा विजय म्हणजेच 'विजयादशमी'

नवरात्र एक हिंदू सण आहे. नवरात्र हा संस्कृत शब्द आहे. नव म्हणजे नऊ दिवस आणि रात्र म्हणजे रात्र. म्हणूनच या सणाला नवरात्र म्हणतात.यालाच शारदीय नवरात्र किंवा शारदोत्सव असेही म्हणतात. नवरात्र म्हणजे आदि शक्ती च्या उपासनेचे दिवस. नउ रात्री व दहा दिवसापर्यंत चालणारा हा सण. या दिवसांमध्ये देवीच्या विविध नऊ रूपांची पूजा केली जाते. भारतामध्ये अनेक भागांमध्ये हा एक लोकप्रिय व अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. हा सण देवी दुर्गेच्या नऊ रूपांची आराधना करण्यासाठी देवीची यथासांग पूजा



करण्यासाठी महत्त्वाचा समजतात. नवरात्र हा सण म्हणजेच वाईटा वर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे.

देवीची विविध रूपे आहेत. पार्वती ,जगदंबा, भवानी, दुर्गा ,काली अशा अनेक रूपात देवीची उपासना केली जाते. या नवरात्र उत्सवात आपण देवीच्या सर्व रूपांची विधिवत पूजा करतो. नवरात्रात देवीसमोर घटस्थापना केली जाते. देवीला वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसवल्या जातात. देवीसमोर होम हवन, आरती, मंत्र उच्चारण करून देवीची आराधना केली जाते. बरेच जण नऊ दिवस उपवास करतात, अनवाणी राहतात, देवीचा जागर करतात अशा अनेक प्रकारे देवीला प्रसन्न करण्यासाठी आदिशक्तीच्या छत्रछायेत स्वतःला वेगवेगळ्या पद्धतीने समर्पित करतात.

अनेक ठिकाणी नवरात्र उत्सव साजरा करताना रामलीलाचे आयोजन केले जाते. दहाव्या दिवशी राम आणि रावणाचे युद्ध दाखवत रावणाचा वध दाखवला जातो. म्हणजेच वाईटावर चांगल्या चा विजय अतिशय आनंदात विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. नऊ दिवसांनी अश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी म्हणजेच दसरा असेही म्हणतात.

देवी दुर्गा, लक्ष्मी ,पार्वती, भवानी, कालिका ही जशी सर्व देवी मातेची नावे आहेत तशीच एक स्त्री सुद्धा परिस्थितीनुसार विविध रूपांमधून आपल्या माणसांची कायम सुरक्षा आणि काळजी घेते. म्हणूनच जेव्हा घरात एखादी नवीन सून येते तेव्हा तिला घरची लक्ष्मी असे संबोधतात. घरात मुलगी झाली तेव्हा सुद्धा घरात लक्ष्मी आल्याचा आनंद सर्वजण साजरा करतात. पण ही स्त्री जेव्हा आपल्या माणसांवर काही संकट येते तेव्हा तीच लक्ष्मी दुर्गा मातेचे रूप घेऊन संकटाशी सामना करण्यास सज्ज असते.

पण फक्त या नऊ दिवसातच देवीची आराधना करायची का? बाकीच्या इतर दिवसांमध्ये का नाही? या नऊ दिवसात देवीची आराधना करणाऱ्या प्रत्येकाने ही समाजातील प्रत्येक स्त्रीचा मान राखणे गरजेचे आहे असे वाटते. स्त्रियांची मानहानी करणे, त्यांचा अपमान करणे, त्यांना तुच्छ लेखणे हे सर्व कृत्य करून जर नवरात्रात देवीच्या आराधना केली तर देवी प्रसन्न होईल का?

देवीची आराधना करायचीच असेल तर सुरुवात घरातील स्त्रियांचा मान राखून केली पाहिजे. उपवास करायचा असेल तर स्त्रियांना हीन लेखुन, त्यांच्याबद्दल वापरल्या जाणाऱ्या वाईट शब्दांचा उपवास करणे गरजेचे आहे.

नवरात्रात एखादी गोष्ट पाळायची असेल तर घरातील, समाजातील स्त्रियांच्या सन्मानाची व सुरक्षिततेचे वचने पाळा.

एकीकडे नवरात्रात नऊ दिवस उपवास करून, अनवाणी फिरून दुर्गा मातेला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करत असाल, आणि दुसरीकडे स्त्रियांचा मान राखू शकत नसाल, स्त्रियांना हीन वागणूक देत असाल तर या उपासनेचा काय उपयोग?

नवरात्र हा एक अतिशय पवित्र आणि निमळं हिंदू सण आहे. नवरात्रात प्रत्येक घरात देवस्थानात घटस्थापना केली जाते. घटस्थापनेच्या अगोदर सर्वत्र स्वच्छता केली जाते. कारण जिथे स्वच्छता असते तिथे देवी मातेचा वास असतो असे शास्त्रात म्हटले आहे. पण फक्त घर आणि देवस्थाने स्वच्छ करून देवीचा वास घरात टिकेल का? मनाची स्वच्छता ही तितकीच महत्त्वाची आहे. मनात चांगले विचार ठेवूनच, कोणालाही न दुखवता केलेली पूजा अर्चना फलदायी ठरते. त्यामुळे समाजातील सर्व वाईट प्रवृत्तीवर, वाईट विचारांवर सत्याचा विजय म्हणजेच विजयादशमी .

सौ शुभांगी अशोक मर्डे-सगर,
सोलापूर
मो.नं. ७९७२२३५२६३

राष्ट्रनिर्मितीचा दीपस्तंभ



राष्ट्रसेवेची शंभर वर्षे आणि पंचपरिवर्तनाची चैतन्यदायी दिशा

भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांचे रक्षण आणि संवर्धन करीत राष्ट्राला एकात्मतेच्या, स्वाभिमानाच्या आणि उच्च शिखरावर नेण्यासाठी स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रवास आज एका ऐतिहासिक आणि सुवर्ण टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष हे केवळ एका संघटनेच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचे शतक नसून, ते संपूर्ण समाजमन राष्ट्रविचाराने उजळून टाकणाऱ्या नवचैतन्याचे, समर्पणाचे आणि अखंड तपस्येचे शतक ठरले आहे.

संघ स्थापनेच्या शताब्दीनिमित्त विविध उपक्रमांचा आणि कार्यक्रमांचा गेल्या वर्षी अत्यंत उत्साहात शुभारंभ झाला. शताब्दी वर्षाचे औचित्य साधून केवळ औपचारिक सोहळे साजरे करण्यापेक्षा,प्रत्यक्षसमाजात पोहोचून समाजप्रबोधन करणे, व्यापक लोकसंपर्क करणे आणि राष्ट्रजागरणासाठी समाजाला कटिबद्ध होणे, यालाच शताब्दी वर्षात प्राधान्य देण्यात आले. हा प्रामाणिक प्रयत्न सर्वार्थाने यशस्वी आणि अत्यंत फलद्रूप ठरल्याचे अनुभवास येत आहे. समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद शताब्दी वर्षाच्या निमित्ताने वर्षभर राबवले गेलेले विविध उपक्रम म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला परस्परांशी जोडणारे मजबूत दुवे ठरले. विजयादशमीनंतर राबवण्यात आलेले व्यापक गृह आणि ग्राम संपर्क अभियान, सामाजिक सलोखा आणि बंधुभाव दृढ करणाऱ्या सामाजिक सद्भाव बैठका, जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात आलेले प्रमुख नागरिक संवाद आणि देशभरात अत्यंत शिस्तबद्धतेने आणि उत्साहाने पार पडलेली हिंदू संमेलने या कार्यक्रमांना समाजातील सर्व थरातून अत्यंत आस्थायुक्त आणि हृदयस्पर्शी प्रतिसाद मिळाला. यासोबतच, तरुण पिढीला राष्ट्र उभारणीच्या मूळ प्रवाहाशी आणि वैचारिक अधिष्ठानाशी जोडण्यासाठी आयोजित केलेली युवक संमेलने राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची आणि नवनिर्माणाची नांदीच ठरली. या व्यापक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात जात-पात, पंथ आणि भेदाभेदाच्या भिंती ओलांडून देशप्रेमाचे, सौहार्दाचे आणि एकात्मतेचे चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले. संपूर्ण समाज संघटित करणे हा संघ स्थापनेचा प्रथमपासून हेतू आहे. देशाचा सर्वांगीण विकास साधणे, हा उद्देश त्याच बरोबर येतो. १३ ते १५ मार्च २०२६ या काळात हरियाणातील समालखा येथे आयोजित करण्यात आलेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत सरकार्यवाह दत्तात्रेयजी होसाबळे यांनी वर्तमानातील राष्ट्रीय परिस्थितीबाबत अत्यंत मार्मिक, सखोल आणि पथदर्शी भाष्य केले. स्वयंसेवकांना आणि समाजाला मार्गदर्शन करताना ते म्हणाले, आज संपूर्ण समाजात राष्ट्रबोध, हिंदुत्वाची उदात्त जाणीव आणि सामाजिक संवेदनशीलता उत्तरोत्तर आणि वेगाने वाढत आहे. याचेच अत्यंत सकारात्मक प्रतिबिंब म्हणून आज समाजातील सज्जनशक्ती अतिशय आत्मियतेने, आदराने आणि उत्साहाने विविध राष्ट्रोपयोगी व विधायक कार्यात स्वतःहून सक्रिय होत आहेत.



डॉ. प्रवीण दबडघाव
प्रांत कार्यवाह, पश्चिम महाराष्ट्र प्रांत

संघकार्याचा विस्तार वेगाने

आजच्या घडीला संपूर्ण समाजात संघकार्याबाबत एक विलक्षण आणि अभूतपूर्व अनुकूलता निर्माण झाली आहे. समाजातील प्रत्येक क्षेत्रातील अधिकाधिक नागरिक संघकार्याशी जोडले जाण्यासाठी उत्सुक आहेत. राष्ट्रउभारणीच्या महान कार्यात संघाकडून समाजाच्या अपेक्षा दिवसेंदिवस अधिक वाढत आहेत. ही वाढती उत्सुकता आणि वाढणारी सज्जनशक्ती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच तिला योग्य दिशा देणारी नित्य सिद्ध शक्ती संघात आणि समाजात अधिक बळकट होणे, ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. समाजाकडून मिळणारे अलोट प्रेम, दृढ विश्वास आणि मान्यता यामुळे स्वयंसेवकांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व अधिक वाढले आहे. शताब्दी वर्षाच्या निमित्ताने निर्माण झालेला हा व्यापक समाजसंपर्क आणि अभूतपूर्व लोकसमर्थन, ही राष्ट्रकार्यासाठी एक अभूतपूर्व ऊर्जा आहे. या ऊर्जेचा योग्य उपयोग करून पुढील काळात संघकार्याचा विस्तार अधिक वेगाने, व्यापकतेने आणि गुणवत्तेने घडवून आणण्याचे सुव्यवस्थित नियोजन आज आखले जात आहे. राष्ट्रधर्माचे प्रामाणिकपणे पालन करणे आणि समाजाच्या वाढत्या आकांक्षांची पूर्तता करणे हे प्रत्येक स्वयंसेवकाचे आद्य कर्तव्य आहे. संघाची मूळ ओळख असलेली स्वयंसेवकत्वाची निष्ठा, संघसंस्कार आणि संघटनात्मक जाणीव अधिक दृढ करून पुढील वाटचाल करणे हेच या संघविचाराचे खरे आणि मूळ सामर्थ्य आहे.



या आगामी वाटचालीत पंचपरिवर्तन हा विषय संघाच्या समाजाभिमुखतेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा मुख्य गाभा बनला आहे.

राष्ट्र प्रथम हा भाव, पंचपरिवर्तन हा स्वभाव हा मूलमंत्र मनामध्ये ठसवून संघाचे स्वयंसेवक आज समाजात अत्यंत निष्ठेने कार्यरत आहेत. स्वबोध (स्वदेशी, स्वतःची भाषा आणि स्व-संस्कृतीचा अभिमान), समरसता (जातिभेदमुक्त समताधिष्ठित समाज), कुटुंब प्रबोधन (कुटुंबसंस्थेचे जतन आणि सुसंस्कार), नागरिक कर्तव्य(कायद्यांचे पालन व शिस्त) आणिपर्यावरण संरक्षण (निसर्गाचा समतोल व झाडांचे संगोपन) हे पंचपरिवर्तनाचे जीवनविषयक स्तंभ आज हळूहळू संपूर्ण समाजाच्या दैनंदिन जगण्याचा एक अविभाज्य भाग बनत आहेत. आधुनिकतेच्या आणि धावपळीच्या युगात दुर्बल होत चाललेल्या कुटुंबसंस्थेला पुन्हा एकत्र आणण्यासाठी कुटुंब प्रबोधन, निसर्गाचा कोप रोखण्यासाठी पर्यावरण संरक्षण आणि समाजातील विषमता समूळ नष्ट करून बंधुभाव निर्माण करण्यासाठी समरसता या विषयांना समाजानेही अत्यंत प्रेमाने आणि आत्मीयतेने स्वीकारले आहे. आगामी काळात या वैचारिक आणि कृतीशील परिवर्तनाला अधिक गती आणि व्यापक रूप दिले जाणार आहे.

संघाच्या समाजाभिमुखतेचा आणखी एक पैलू म्हणजे संघ व विविध संस्थांद्वारे चालवली जाणारी सेवाकार्ये. आज संपूर्ण देशभरात शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, स्वावलंबन या क्षेत्रात सुमारे दीड लाखांहून अधिक सेवा उपक्रम अत्यंत निरपेक्ष भावनेने आणि आत्मीयतेने सुरू आहेत. कोणत्याही प्रसिद्धीची किंवा लाभाची अभिलाषा न बाळगता, प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहून समाजातील शेवटच्या आणि वंचित घटकाच्या आयुष्यात आनंदाचा आणि प्रकाशाचा दिवा लावणारी ही सेवाकार्य म्हणजे संघ विचारांचे आणि राष्ट्रप्रेमाचे साक्षात जिवंत रूप आहे.

राष्ट्रनिर्मितीचा हा महायज्ञ आता केवळ एका संघटनेपुरता मर्यादित न राहता, तो संपूर्ण समाजाचा जीवनधर्म आणि राष्ट्रधर्म बनत चालला आहे. शताब्दी वर्षाच्या या अद्भुत अनुभवातून मिळणाऱ्या नवचैतन्याने आणि प्रेरणेने स्वयंसेवक अत्यंत नम्रतेने, तत्परतेने आणि समर्पण भावनेने राष्ट्रसेवेच्या कार्यात स्वतःला झोकून देत आहेत. कारण शेवटी सर्व भारतीयांचे ध्येय एकच आहे. आपल्या प्रिय भारतभूला पुन्हा एकदा वैभवशाली आणि जगद्गुरूच्या सर्वोच्च स्थानी विराजमान करणे!

सोलापूर

तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

डायरेक्ट मिलच्या दरात खरेदी करा.

N.R. DHOOT GROUP Since 1975

श्री धूत सिल्क सारीज्

९१२, चाटी गल्ली, सोलापूर. | कावळे मेडिकलच्या बोळात, चाटी गल्ली, बाळीवेस, सोलापूर.

लोकमत व धूत सिल्क सारीज् प्रस्तुत

दसरा दिवाळी खरेदी महोत्सव २०२१

खरेदी करा कुपन मिळवा

जिंका लाखोंची बक्षिसे

योजनेचा कालावधी १२ ऑक्टो. ते ११ नोव्हे. २०२६

विचारपुष्प



एकदा आत आलेले पाणी बाहेर जाता कामा नये. एकदा ज्यांचा पाय संघात पडला, ते कधीही संघापासून दूर जाणार नाहीत, असा आत्मविश्वास आपल्या ठायी उत्पन्न झाला पाहिजे.


स्व. डॉ. केशव बळीराम हेडगेवार
रा. स्व. संघाचे
आद्य सरसंघचालक

सोलापूर तरुण भारत

उद्या अंक नाही

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी विजयादशमी निमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक



भारतातही हिंसाचाराचा कट

अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेची माहिती; नेटवर्कमध्ये ५० संस्थांचा समावेश



वॉशिंग्टन, १९ ऑक्टोबर

फ्रान्समधील विद्यार्थी आंदोलनामागे कामगार संघटना, राजकीय पक्ष आणि डाव्या गटांसह ५० संघटनांचा समावेश आहे. फ्रान्सच्या धरतीवर भारतात विविध मुद्यांवर करण्यात आलेल्या आंदोलनांच्या माध्यमातून हिंसाचार घडवण्याचा कट आखण्यात आला. यामागे जागतिक डाव्या संघटना असल्याचा दावा अमेरिकेची गुप्तचर संस्था एफबीआयने अहवालातून केला आहे.

साम्यवादी, समाजवादी आणि डाव्या संघटना शालेय परिस्थितीविरोधातील आंदोलनांचा वापर त्यांच्या व्यापक राजकीय आणि वैचारिक अजेंड्यांना पुढे नेण्यासाठी करत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

या नेटवर्कच्या कारवाया अमेरिका, ब्रिटन, ग्रीस, ब्राझील आणि भारतापर्यंत पसरलेल्या आहेत. सरकारी धोरण आणि विविध मुद्यांना हवा देऊन तरुणांमध्ये रोष निर्माण करणे आणि आंदोलन, मोर्चा, रॅलीचे आयोजन करून हिंसाचार घडवून सरकारची प्रतिमा लोकांमध्ये मलिन करणे त्यांचा अजेंडा आहे. युरोपसह भारतात सरकार उलथवून टाकणे तसेच, साम्यवादी आणि डाव्या विचारसणीचे सरकार स्थापन करणे त्यांचे लक्ष्य आहे.

फ्रान्समधील विद्यार्थी आंदोलनांमागे जागतिक डाव्या संघटनांचे एक नेटवर्क असल्याचे अहवालात म्हटले आहे. जागतिक आंदोलनासंदर्भातील गोपनीय अहवाल एफबीआयने अमेरिकन कॉंग्रेसला सादर केला असून, अमेरिकेतही अशाच प्रकारचे आंदोलन होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

समर्थकांना संघटित करण्याची रणनीती

५० संघटनांपैकी १५ विद्यार्थी किंवा युवा संघटना आहेत. उर्वरित ३५ संघटनांमध्ये कामगार संघटना, साम्यवादी आणि समाजवादी संघटना, राजकीय पक्ष, नागरी हक्क गट आणि इतर प्रचार करणाऱ्या संघटनांचा समावेश आहे. हे नेटवर्क फ्रान्सच्या पलीकडे अमेरिका, युके, ग्रीस, ब्राझील आणि भारतापर्यंत विस्तारलेले आहे. यात सामील असलेल्या संघटना आंतरराष्ट्रीय माध्यमांद्वारे समर्थकांना संघटित करणे, संपाचे आवाहन करणे आणि आंदोलनांना प्रोत्साहन देण्याचे काम करत आहेत. ◀ (वृत्तसंस्था)

सत्तापालटासाठी तरुणांचा वापर

फ्रेंच विद्यार्थी चळवळ आणि तिच्याशी संबंधित समर्थक नेटवर्कमध्ये ५० संघटनांची ओळख पटवण्यात आली आहे. या अहवालात असा आरोप करण्यात आला आहे की, साम्यवादी, समाजवादी आणि डाव्या संघटना शालेय परिस्थितीविरोधातील आंदोलनांचा वापर त्यांच्या व्यापक राजकीय आणि वैचारिक अजेंड्यासाठी करत आहे. सध्याच्या सरकारविरोधात तरुणांमध्ये रोष निर्माण करून सत्तापालट घडवणे त्यांचे मुख्य लक्ष्य आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधी वितरित करण्यात येत आहे. ■

> मनात द्वेष घेऊन आलेल्या लोकांच्या वाढत्या संख्येने फ्रान्सला उद्ध्वस्त केले आहे. खूप उशीर होण्यापूर्वी तुमच्या सीमा बंद करा आणि त्यावर नियंत्रण ठेवा. फ्रान्स आपल्या क्रांतीसाठी प्रसिद्ध आहे आणि लोक तिथे जाऊन क्रांतीत सामील होऊ शकतात. जगभरातील लोकशाही देशांनी डाव्यांची योजना उलथून लावली पाहिजे, अशा शक्तीपासून सावध राहायला हवे.
>
> **- डोनाल्ड ट्रम्प,**
> अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष

भारतातील आंदोलनांशी संबंधित अनेक पोस्ट

अहवालात फ्रान्स-स्थित 'इंडियन अलायन्स पॅरिस' या संघटनेचाही उल्लेख आहे, जी विद्यार्थी, संशोधक आणि व्यावसायिकांशी संबंधित आहे. असंघटनेने सोशल मीडियावर फ्रान्समधील आंदोलनांना पाठिंबा दर्शवला आणि त्यांची तुलना भारतातील विद्यार्थी आंदोलनांशी केली. भारतातील आंदोलनांशी संबंधित अनेक पोस्ट देखील त्यांनी प्रसारित केल्या. संघटनेने लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अटकेचा एक व्हिडीओ शेअर केला. त्यात 'भारत सरकारचा धिक्कार असो', 'दिल्ली पोलिसांचा धिक्कार असो', असे शीर्षक दिले होते.

दुर्गाष्टमीला तुळजाभवानी मंदिरात वैदिक होम-हवनाची पूर्णाहुती

तभा वृत्तसेवा,
तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर-

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्रीतुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवातंर्गत सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुर्गाष्टमीचा धार्मिक सोहळा भक्तिभावाने पार पडला. धार्मिक परंपरेनुसार आई श्रीतुळजाभवानी देवीची म हिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली. शारदीय नवरात्र महोत्सवात दुर्गाष्टमीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. आदिशक्तीच्या पराक्रमाचे, दुष्ट शक्तींवरील विजयाचे आणि धर्मसंस्थापनेचे प्रतीक म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

जिल्हाधिकारी तथा श्रीतुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार आणि त्यांच्या पत्नी सौमय्याश्री पुजार यांनी वैदिक होम-हवन विधीचे यजमानपद स्वीकारले होते. दुर्गाष्टमीच्या निमित्ताने होम कुंडावर कोहळा व नारळ यांची पूर्णाहुती देत होम-हवन विधीची सांगता करण्यात आली. गणेश विहार येथे कोल्हापूर संस्थानच्या वतीने होम-हवन विधीचे आयोजन करण्यात आले होते. या विधीत प्रतिपचंद्र प्रयाग व मंदा प्रयाग यांनी यजमान म्हणून सहभाग घेतला.

हैदराबादच्या रावबहादूर संस्थानच्या वतीने आयोजित होम-हवन विधीत कोंडो परिवारातील विनीत कोंडो व स्वप्नाली कोंडो यजमान म्हणून सहभागी झाले. या धार्मिक सोहळ्यावेळी उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, उपाध्ये बंडू पाठक, अनंत कोंडो, रामचंद्र पाटील यांच्यासह पुजारी, सेवेकरी, भाविक उपस्थित होते.



SBI
भारतीय स्टेट बँक
केंद्रीय भरती व पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
दूरध्वनी: ०२२-२२८२०४२७

अर्जासाठी क्यूआर स्कॅन करा

ठराविक मुदतीचा रोजगार तत्त्वावर विशेषज्ञ संवर्ग अधिकारी भरती

भारतीय नागरिकांकडून ठराविक मुदतीचा रोजगार आधारावर खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

जाहिरात क्र.: CRPD/SCO/२०२६-२७/३०

पदाचे नाव	रिक्त जागा	वय (३०.०९.२०२६ पर्यंत)	
		किमान	कमाल
महाव्यवस्थापक आणि मुख्य एआय अधिकारी	१	४०	५५
उप-महाव्यवस्थापक (रिस्क अँड ऑपरेशनल ॲनालिटिक्स)	१	३५	५०
उप-महाव्यवस्थापक (एआय गव्हर्नन्स अँड कंप्लायन्स)	१		
उप-महाव्यवस्थापक (डेटा इंजिनिअरिंग, मॉडेल ॲप्लिकेशन डेव्ह आणि एआय ऑप्स)	१		
एआय सोल्युशन आर्किटेक्ट	१	३०	४५
एंटरप्राइझ एआय आर्किटेक्ट	१		

पात्रता निकष (वय, अनुभव, नोकरीचे तपशील इत्यादि), रिक्त जागा तपशील, आवश्यक शुल्क आणि इतर तपशीलासाठी उपरोक्त विस्तृत जाहिरात क्रमांकांतर्गत बँकेच्या वेबसाईटवर **https://sbi.bank.in/web/careers/current-openings** लॉग ऑन करा. येथे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या व ऑनलाईन अर्ज शुल्क प्रदान करण्याच्या लिंक उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी व शुल्क भरण्यापूर्वी सविस्तर जाहिरात बघून आपली पात्रता आणि इतर तपशील यांची खात्री करण्यासाठी तपशीलवार जाहिरात तपासुन घ्यावी. काही शंका असल्यास, कृपया आम्हाला **"CONTACT US"** →"**Post Your Query**" या लिंकद्वारे लिहा, जी बँकेची वेबसाईट (**https://sbi.bank.in/web/careers/post-your-query**) वर उपलब्ध आहे.

- **ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची तारीख : १९.१०.२०२६ ते ०९.११.२०२६.**

स्थान: मुंबई
दिनांक: १९.१०.२०२६
महाव्यवस्थापक (आरपी आणि पीएम)

भव्य शुभारंभ

८३ वर्षांचा विश्वास
उत्तम दर्जा
योग्य किंमत

प्रत्येकासाठी काही खास.... संपूर्ण कुटुंबांसाठी एकच विश्वास
'व्ही. आर. पवार' येत आहे धाराशिवमध्ये एक भव्य फॅमिली फॅशन दालन घेऊन...



व्हि. आर. पवार

21 ऑक्टोबर

उद्घाटनाची वेळ: सकाळी १०.०० वाजता

यांच्या शुभहस्ते

मा.ऋतु खोकर
आयपीएस पोलीस अधीक्षक, धाराशिव

मा.ज्योती पाटील
अपर जिल्हाधिकारी, धाराशिव

मा.स्वाती शेडे
उपजिल्हाधिकारी (महसूल), धाराशिव

मा.डॉ. मृणाल जाधव
तहसीलदार, धाराशिव

मा.नीता अंधारे
मुख्याधिकारी, धाराशिव नगर परिषद

स्थळ -MIDC रोड, तेरणा कॉलेज समोर, सिटी सेंटर मॉल, धाराशिव.

समर्थ ॲडस्

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अग्रलेख

आंदोलन की अराजक?

सध्या सर्वत्र अनेकांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत आणि कोणत्याही मार्गाने असे परिवर्तन घडवून आणले पाहिजे, असा उघड विचार जोमाने मांडला जाऊ लागला आहे. प्रत्येक परिवर्तन हिंसाचाराने, उद्रेकाने आणि असंतोषाच्या अतिरेकातूनच घडविता येते, हाच सध्या परिवर्तनासाठी अवलंबिल्या जाणाऱ्या मार्गाचा गाभा असावा असे चित्र जगातील काही देशांत सुरू असलेल्या घडामोडींमुळे दिसू लागले आहे. गेल्या काही वर्षांत बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळमध्ये अशाच क्रांतिविचारांच्या उद्रेकातून असेच घडले. प्रस्थापित सत्तेविरोधातील असंतोषाचा आवाज एकवटला आणि तो रस्त्यावर उतरला. पण, जनतेचा आवाज एकवटला तर परिवर्तन घडू शकते, हा काही नव्याने झालेला साक्षात्कार नाही. गेल्या अनेक दशकांतील प्रत्येक क्रांती आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेला जनतेच्या संघटित शक्तीची ताकद मिळाली होती, हा इतिहासच आहे. भारतावरील दीड शतकाची इंग्रजी सत्ता उलथवून स्वातंत्र्याचे परिवर्तनपर्व सुरू झाले, हा इतिहासदेखील जनतेच्या अभूतपूर्व ऐक्यशक्तीचाच परिणाम होता. त्यामुळे जनतेचा संघटित आवाज हे परिवर्तनाचे शस्त्र असते, यात दुमत नसले, तरी ती बेबंदपणे चालविली तरच परिवर्तन घडविता येते असे इतिहासाचे दाखले खचीतच नाहीत. भारताचे ऐतिहासिक स्वातंत्र्य आंदोलन हा त्याचा साक्षात पुरावा आहे. गांधींजींच्या अहिंसक आंदोलनाचे नैतिक बळ लाभलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या दबावामुळे ब्रिटिशांना भारत सोडणे भाग पडले असे मानणारा एखादा नेता आज मात्र परिवर्तनासाठी रस्त्यावर उतरून शक्य ते सर्व मार्ग अवलंबिण्याची उतावीळ उद्विग्नता व्यक्त करतो, तर बांगलादेशातील हिंसक आणि विध्वंसक आंदोलनाचा आदर्श समोर ठेवावा अशी अपेक्षा कोणी व्यक्त करतो, तेव्हा आंदोलनांच्या मार्गाने परिवर्तन घडवू पाहणाऱ्यांच्या हेतूविषयी शंका निर्माण होतात. म्हणूनच, ज्या बांगलादेशचा कित्ता गिरविण्याची स्वप्ने पाहिली जातात, ज्या श्रीलंका किंवा नेपाळमधील परिवर्तनाचे दाखले देत भारतातील आंदोलनांना धार चढविण्याचा आटापिटा केला जातो, त्या आंदोलनांनी त्या देशांमध्ये कोणते परिवर्तन घडविले, ज्या अपेक्षेने जनतेने आंदोलनांना साथ दिली, त्या अपेक्षा परिवर्तनानंतर पूर्ण झाल्या का, याचाही आढावा घेणे गरजेचे आहे. कारण, भारताच्या आंदोलनांची दिशा अशाच मार्गावर भरकटविण्याचे प्रयत्न सुरू असताना, फ्रान्समध्येही असंतोषाच्या उद्रेकाची उदाहरणे समोर येऊ लागली आहेत.

गेल्या काही वर्षांत किंवा गेल्या दशकभरात बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ या देशांमध्ये जनक्षोभाचा उद्रेक झाला, आंदोलने पेटली आणि सत्ताधीशांना पदच्युत होऊन पळ काढावा लागला. या सत्ताबदलांनंतर तेथील नागरिकांच्या नजरेसमोर नव्या, पारदर्शक आणि समृद्ध भविष्याची अपेक्षाचित्रे रेखाटली गेली होती. परंतु, सत्तांतराचा धुमाकूळ शांत झाल्यानंतर जेव्हा वास्तवाचे चित्र समोर आले, ते मात्र फारसे दिलासादायक नव्हते. उलट, सत्ताबदल म्हणजे व्यवस्थेचे तत्काळ आणि संपूर्ण परिवर्तन नाही, या कटू वास्तवाचाच या देशांना अनुभव येऊ लागला होता. परिवर्तनाच्या अपेक्षेने घडविल्या गेलेल्या आंदोलनांमुळे प्रस्थापित झालेल्या नव्या सत्तेने लोकांच्या अपेक्षांना किती न्याय दिला आणि आज हे देश खरोखरच समस्यामुक्त झाले आहेत का, याचे वास्तविक चित्र आंदोलनांच्या अपेक्षांना फारसा दिलासा देणारे नाही हे स्पष्ट दिसत असल्यामुळेच, भारतात आंदोलनाचा मुलामा देत रेटला जाणारा सत्तापरिवर्तनाचा संघर्ष आणि फ्रान्समध्ये सुरू असलेल्या आंदोलनाचा आढावा घ्यावयास हवा.

सुमारे चार वर्षांपूर्वी, महागाईचा भडका, अन्न, इंधनाची भीषण टंचाई आणि कर्जाच्या डोंगराखाली दबलेली अर्थव्यवस्था यामुळे उफाळलेल्या जनआक्रोशाच्या वणव्यात श्रीलंकेतील राजपक्षे कुटुंबाच्या प्रदीर्घ सत्तेचा अंत झाला. सत्ताबदलानंतर श्रीलंकेने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मदतीने कठोर आर्थिक निर्णय घेतल्यामुळे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडण्यापासून वाचली. दैनंदिन टंचाईतून लोकांना दिलासा मिळाला असला, तरी आयएमएफच्या अटींमुळे झालेली प्रचंड करवाढ आणि महागाईचा फटका आजारी व मध्यमवर्गीय कुटुंबांना आजही सहन करावा लागत आहे. बांगलादेशातील आंदोलनानंतरचे वर्तमानही फारसे वेगळे नाही. २०२४ मध्ये सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण आणि हुकूमशाहीच्या विरोधातील आंदोलनाने शेख हसीना यांना थेट देश सोडण्यास भाग पाडले. त्यानंतर पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमधून लोकशाही मार्गाने नवी सत्ता प्रस्थापित झाली आणि क्रांतीचा जोश ओसरल्यानंतर बांगलादेशात मोठा आर्थिक व सामाजिक पेच निर्माण झाला. बेरोजगारी, वाढती महागाई आणि कोलमडलेली बँकिंग व्यवस्था यामुळे जनता आजही होरपळत आहे. नेपाळमध्ये जनआंदोलनानंतर राजाची सत्ता गेली आणि संविधान आले, परंतु भ्रष्टाचाराचे निर्मूलन, आर्थिक विकास आणि रोजगाराची निर्मिती या बाबतीत नेपाळमधील जनतेचा प्रचंड अपेक्षाभंग झाला आहे. दरवर्षी लाखो नेपाळी तरुणांना रोजगारासाठी परदेशात जाण्यास भाग पडत आहे.

सत्तापरिवर्तन म्हणजे समस्यामुक्ती हा संभ्रम दूर होण्याची गरज अधोरेखित होत असताना आता फ्रान्समध्येही आंदोलनांचा उद्रेक होत आहे. अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या राजकीय प्रभावासमोर आव्हाने उभी राहिली आहेत. हिंसाचार, तोडफोडीच्या घटनांमुळे सार्वजनिक सुरक्षा आणि मालमत्तांच्या संरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सामाजिक अशांततेच्या या वातावरणामुळे फ्रान्सच्या राजकारणाचे आजवरचे प्रयोग कमकुवत होताना दिसत आहेत. गेल्या शनिवारी देशभरातील पाच लाखांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले. एकट्या पॅरिसमध्ये लाखाहून अधिक लोकांनी मोर्चे काढले. अनेक ठिकाणी झालेली लुटालूट, जाळपोळ, पोलिसांशी संघर्ष यांमुळे जनतेच्या असंतोषाची ताकद स्पष्ट झाली असली, तरी या ताकदीने अराजकाचा मार्ग स्वीकारला, तर भविष्यात त्यांच्या दबावाखाली परिवर्तन झाले तरी अपेक्षापूर्तीचा आनंद मात्र अवघडच राहील, असा अन्य देशांतील आंदोलनांच्या इतिहासाचा अनुभव फ्रान्सला घ्यावा लागेल. फ्रान्सकरिता हीच शक्यता अधिक असल्याने, देशात अस्थिरता आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरण्यापलीकडे या आंदोलनांतून नेमके काय साध्य होईल, हा प्रश्न सध्या अनुत्तरितच असल्याने अधिक चिंताजनक आहे. फ्रान्समधील जनआंदोलनांना तीन शतकांहून अधिक जुना इतिहास आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने देशात राजकीय परिवर्तन घडविले, तर गेल्या शतकातील आंदोलनाने शिक्षण व्यवस्थेतील बदलाची हाक दिली. गेल्या दशकात महागाई आणि इंधन दरवाढीविरुद्ध जनता रस्त्यावर उतरली, तर तीन-चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्तीचे वय वाढविल्याच्या विरोधात देशात आंदोलने झालीत. नव्याने सुरू झालेल्या आंदोलनाला शैक्षणिक दुरवस्थेविरुद्धचा असंतोष कारणीभूत ठरला असला तरी आता हे आंदोलन व्यापक आणि हिंसकही झाले आहे. अशा आंदोलनात जनतेचा सहभाग दिसत असला, तरी हिंसाचार, लुटालूट आणि कायदा सुव्यवस्था स्थितीला जेव्हा आव्हान दिले जाते, तेव्हा त्यामागच्या छुप्या हेतूंचे पितळ आपोआप उघडे पडत असते. सध्याच्या आंदोलनजीवींच्या जागतिक लाटेचा तडाखा आता फ्रान्सला बसू लागला आहे. अस्थैर्य आणि अराजक माजवून सत्तांतरे घडविण्याचा व्यापक आंतरराष्ट्रीय कट आखला जात असल्याच्या संशयाला पुष्टी देणारे वातावरण जगात दिसू लागल्याने, शांततामय जगण्याच्या जनतेच्या मूलभूत हक्कांची जपणूक कशी होणार हा प्रश्न फ्रान्सलादेखील आता सतावू लागला आहे. जगातील सध्याचे कोणतेही आंदोलन या हक्काची हमी देऊ शकत नाही, हेच अंतिम सत्य आहे. ■

विशेष

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : शताब्दी प्रवास

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी वर्ष समारोपीय विजयादशमी उत्सव मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी नागपुरात होत आहे. त्यानिमित्त या लेखात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासाच्या संदर्भात चार प्रमुख विषयांचा समावेश आहे. यामध्ये संघाचे कार्य, विस्तार आणि उद्देश, त्याच्या प्रवासातील महत्त्वाचे टप्पे आणि पंच परिवर्तनाचा समावेश आहे. या विषयाच्या माध्यमातून संघाच्या स्थापनेपासून ते त्याचा विकास, परंपरा आणि राष्ट्रजीवनातील त्याच्या योगदानापर्यंतच्या इतिहासाचा एक व्यापक आढावा घेण्यात आला आहे.

संघ : कार्य, विस्तार आणि उद्दिष्टे

संघाची स्थापना : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना २७ सप्टेंबर १९२५ रोजी (विजयादशमी, विक्रम संवत १९८२) झाली. संपूर्ण हिंदू समाजाला संघटित करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. तेव्हापासून, सहयोग आणि सहभागातून संघाचे कार्य सतत वाढत गेले आहे. दैनंदिन शाखांच्या माध्यमातून, बाल, तरुण आणि प्रौढ त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल अनुभवत आहेत. त्यामुळे समाजात संघाची शक्ती आणि स्वीकारार्हता सतत वाढत आहे. आज, या १०० वर्षांच्या प्रवासाने समाजात संघकार्याबद्दल जाणून घेण्याची आणि त्याच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडले जाण्याची उत्सुकता निर्माण केली आहे.

संघ संस्थापक प. पू. डॉ. हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. ब्रिटिशांच्या गुलामगिरीमुळे ते खूप दुःखी होते. परंतु केवळ स्वातंत्र्य मिळवणे पुरेसे नाही, असे त्यांचे मत होते. भारताच्या गुलामगिरीचे मूळ कारण शोधून त्यावर उपाययोजना केली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. आत्मजागृती, स्वाभिमान, एकता, अनुशासन आणि राष्ट्रीय चारित्र्य निर्माण हे अत्यावश्यक आहे, असे त्यांचे मत होते. या उद्देशाने, स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय राहूनच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.



द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजींच्या मते, विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर, डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि विखुरलेल्या हिंदू समाजाला एकसंध करण्याचे कार्य सुरू केले. संपूर्ण हिंदू समाजाला भगव्या झेंड्याखाली एकसंध करण्यासाठी संघ अविरतपणे कार्यरत आहे. आज सर्वत्र बिकट परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत संघटनेशिवाय अस्तित्व अशक्य आहे. हजारो वर्षांचे अधःपतन एका क्षणात बदलवता येणार नाही, हे संघाला माहीत आहे. पण आम्ही यामुळे निराश नाही. आम्हाला संपूर्ण विश्वास आहे की एकजूट होऊन हिंदू समाज निश्चितपणे आपले पूर्वीचे वैभव पुन्हा प्राप्त करेल.

संघाची पहिली १५ वर्षे : डॉ. हेडगेवार यांच्या निधनानंतर तेराव्या दिवशी, ३ जुलै १९४० रोजी, नागपूरमध्ये डॉ. हेडगेवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली होती. सरसंघचालक म्हणून श्रीगुरुजींनी, डॉ. हेडगेवार यांचे सरसंघचालक म्हणून स्मरण करून त्यांच्या कार्याचा उद्देश स्पष्ट केला.

नागपूरनंतर, संघकार्याला १९२९ मध्ये वर्धा आणि त्यानंतर १९३२ मध्ये पुण्यात सुरुवात झाली. लवकरच, महाराष्ट्रातील इतर शहरांमध्येही विस्तार सुरू झाला. १९२९ मध्ये ३७ असलेली शाखांची संख्या १९३३ पर्यंत १२५ झाली. डॉ. हेडगेवार एका पत्रात लिहितात, आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य कोणत्याही एका शहरासाठी किंवा प्रांतासाठी सुरू केलेले नाही. आपल्या संपूर्ण हिंदुस्थान देशाला शक्य तितक्या लवकर संघटित करण्याच्या आणि हिंदू समाजाला बलसंपन्न करण्याच्या उद्देशाने हे सुरू करण्यात आले आहे.

संघाची दूरदृष्टी आणि विस्तार ब्रिटिश सरकारला अनुकूल नव्हता. दिल्लीत, ब्रिटिश अधिकारी एम. जी. हॅलोट यांनी संघाला रोखण्यासाठी मध्य प्रांत सरकारवर दबाव आणला. अखेरीस, डिसेंबर १९३३ मध्ये, मध्य भारतातील शिक्षक आणि पालिका कर्मचाऱ्यांना संघाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली. मार्च १९३४ मध्ये, विधानसभेत बंदीला विरोध करणारा कपात प्रस्ताव मांडण्यात आला. त्याच्या बाजूने बोलणाऱ्या सदस्यांमध्ये टी. एच. केदार, आर. डब्ल्यू. फुले, रमाबाई तांबे, बी. जी. खापर्डे, आर. ए. कानिटकर, सी. बी. पारेख, यू. एन. ठाकूर, मनमोहन सिंग, एम. डी. मंगलमूर्ती, एस. जी. सपकाळ आणि डब्ल्यू. वाय. देशमुख यांचा समावेश होता. संघाच्या दूरदृष्टीला मिळालेला हा पाठिंबा अभूतपूर्व होता. चर्चेच्या अखेरीस, ब्रिटिश सरकारने लादलेली बंदी मागे घेण्यात आली.

डॉ. हेडगेवार यांच्या नेतृत्वात देशभरात प्रवासाला सुरुवात झाली. भाऊराव देवरस (लखनौ), राजाभाऊ पातुरकर (लाहोर), वसंतराव ओक (दिल्ली), एकनाथ रानडे (महाकौशल), माधवराव मुळे (कोकण), जनार्दन चिंचाळकर आणि दादाराव परमार्थ (दक्षिण भारत), नरहरी पारिख आणि बापूराव दिवाकर (बिहार) आणि बाळासाहेब देवरस (कोलकाता) यांनी संघाच्या कार्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली.

याचा परिणाम म्हणून, सुमारे एका दशकात, देशभरात ६०० हून अधिक शाखा आणि अंदाजे ७०,००० स्वयंसेवक तयार झाले. १९३९ पर्यंत दिल्ली, पंजाब, बंगाल, बिहार, कर्नाटक, मध्य प्रांत आणि मुंबई (सध्याचे महाराष्ट्र आणि गुजरात) येथे संघाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या.

डॉ. हेडगेवार स्थापनेपासून १५ वर्षे संघाचे पहिले सरसंघचालक होते. या काळात, त्यांनी संघाच्या शाखांच्या माध्यमातून संघटना उभारण्यासाठी एक विचारपूर्वक प्रणाली विकसित केली. या संघटनात्मक प्रणालीसोबत राष्ट्रवादाचा मंत्रही होता. त्यांनी आत्मविश्वासाने आश्वासन दिले की, जर आपण संघाच्या चांगल्या शाखा उभारल्या, ते जाळे शक्य तितके दाट विणले आणि संपूर्ण समाजाला संघ शाखांच्या प्रभावाखाली आणले, तर राष्ट्रीय स्वातंत्र्यापासून ते आपल्या सर्वांगीण प्रगतीपर्यंतच्या सर्व समस्या नक्कीच सुटतील. या काळात त्यांच्या संपर्कात आलेल्यांनी नेहमीच त्यांची आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. यामध्ये महर्षी अरविंद, लोकमान्य टिळक, मदन मोहन मालवीय, विनायक दामोदर सावरकर, बी. एस. मुंजे, विठ्ठलभाई पटेल, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि के. एम. मुन्शी यांचा समावेश होता.

संघाचे कार्य : व्यक्ती निर्माण

संघाने राष्ट्रीय चारित्र्य निर्माण आणि सामूहिक सद्गुण जोपासण्यासाठी, या राष्ट्रीय गुणांचा सामूहिक अभ्यास करण्यासाठी आणि आपले ध्येय सतत लक्षात ठेवण्यासाठी 'शाखा' नावाची एक प्रणाली विकसित केली. दररोज एक तास चालणारी ही शाखा, संपूर्ण भारतीय समाज एक आहे, समान आहे आणि सर्व जन आपलेच आहेत, ही भावना रुजवते. याव्यतिरिक्त, उद्यमशीलता, धैर्य, संयम, शक्ती, बुद्धिमत्ता आणि शौर्य यांसारखे गुण जोपासण्यासाठी शाखेत विविध खेळ आणि इतर उपक्रम आयोजित केले जातात. अनुशासन, ऐक्य, शौर्य आणि सामूहिकतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी, संचलन, घोषाच्या तालावर पथसंचलन आणि योग-व्यायाम यांसारखे कार्यक्रम शाखेत सुरू करण्यात आले आणि ते आजही सुरू आहेत.

शाखा म्हणजे व्यक्ती निर्माणाची सतत साधना आहे. इथेच आपण समाजाला आपलेसे करण्याची आणि त्यासाठी काहीतरी, कधी कधी तर सर्वस्व अर्पण करण्याची संस्कृती आत्मसात करतो. हजारो स्वयंसेवक या संकल्पाला व्रत मानून आणि आयुष्यभर त्याचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेऊन सक्रिय आहेत. अशा सहकारी कार्यकर्त्यांकडून प्रेरणा घेऊन, हजारो आणि लाखो स्वयंसेवक हा समर्पण-यज्ञ आनंदाने आणि अखंडपणे पुढे चालवत आहेत.

संघाला २० वर्ष झाल्यानंतर श्रीगुरुजी म्हणाले, २० वर्षांपूर्वी जेव्हा संघाची स्थापना झाली, तेव्हा भारतात इतर संघटना नव्हत्या असे नाही. देशात असंख्य संघटना होत्या, प्रत्येक संघटना आपापल्या मार्गावर चालत होती आणि आपापल्या पद्धतीने काम करत होती, पण 'हिंदुस्थान हे हिंदूंचे नैसर्गिक जन्मस्थान, कर्मभूमी आणि पुण्यभूमी आहे' याची कोणालाही जाणीव नव्हती. हे सत्य विसरले गेले होते. आपली प्राचीन संस्कृती, सभ्यता आणि इतिहास विसरून, लोकांनी नव्याने काम करण्यास सुरुवात केली, जणू काही येथे पूर्वी कधी काही अस्तित्वातच नव्हते. विद्वान म्हणायचे, 'आपले राष्ट्र आता तयार होणार आहे.' भारत प्राचीन काळापासून एक सुसंस्कृत समाज आहे आणि स्वतः एक महान राष्ट्र आहे, हे ज्ञान हरवले होते. आपण आपला भूतकाळ विसरलो होतो आणि त्याची घृणा करू लागलो होतो. आपल्याला 'हिंदू' या शब्दाचीही घृणा होऊ लागली होती. पण जो माणूस आपल्या भूतकाळाची घृणा करतो, तो कधीही भविष्य घडवू शकत नाही. श्रीगुरुजींना वाटत होते की हिंदूंमधील ही प्रवृत्ती एका अत्यंत प्राचीन आणि संपन्न संस्कृतीचा नाश करत आहे. आपली संस्कृती विशाल आहे, जी केवळ मानवांनाच नव्हे, तर संपूर्ण चराचर सृष्टीला आत्मवत् मानते.

श्रीगुरुजी विचारतात, किती हृदयांमध्ये आपले जीवन निःस्वार्थपणे राष्ट्रसेवेसाठी समर्पित करण्याचा दृढनिश्चय आहे? ते पुढे म्हणतात, माझा समाज हाच माझा देव, माझे ध्येय-ही भावना दिसून येत नाही. श्रीगुरुजींच्या मते, संघाची स्थापना यासाठी झाली की प्रत्येक हिंदूला आपल्या हिंदू असण्याचा, आपल्या हिंदू गौरवाचा, हिंदू जीवनाचा, हिंदू परंपरेचा आणि हिंदू इतिहासाचा अभिमान वाटावा आणि त्यांनी स्वतःला हिंदू समजावे.

संघाचा विस्तार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वार्षिक अहवालाच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी देशभरात ५१,७४० ठिकाणी ८३,१२९ शाखा कार्यरत होत्या. आता ही संख्या वाढून ५५,६८३ ठिकाणी ८८,९४९ शाखा झाली आहे. अशाप्रकारे, एका वर्षात ३,९४३ नवीन ठिकाणे जोडली गेली आहेत आणि शाखांची एकूण संख्या ५,८२० ने वाढली आहे. हे संघटनेच्या कार्याचा सातत्यपूर्ण आणि व्यापक विस्तार दर्शवते. तसेच संघापासून प्रेरणा घेत कार्य करणाऱ्या अनेक संघटना आहेत. विद्या भारती, विश्व हिंदू परिषद, भारतीय किसान संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय शिक्षण मंडळ, अ. भा. पूर्व सैनिक सेवा परिषद, भारत विकास परिषद, सीमा जागरण मंच, राष्ट्रीय सेवा भारती, वनवासी कल्याण आश्रम, स्वदेशी जागरण मंच, सहकार भारती, राजकीय क्षेत्रात भारतीय जनता पार्टी, महिलांसाठी राष्ट्र सेविका समिती, ग्राहकांच्या हितासाठी अ. भा. ग्राहक पंचायत, संस्कृत भारती यासह अनेक संघटनांचा समावेश आहे.

संघ आणि युवा

राष्ट्र उभारणीसाठी युवकांना आवाहन : आपल्या भाषणांमध्ये, श्रीगुरुजी अनेकदा युवकांना प्रोत्साहन देत असत आणि त्यांना आवाहन करत की, आपल्या पूर्ण शक्तिनिशी देशभक्तीची ही ज्योत प्रज्वलित करा. तिला देशव्यापी आणि तेजस्वी बनवा. त्या प्रकाशात अज्ञानाचा सर्व अंधकार नाहीसा होईल. तो प्रकाश जगातील सर्व असुरी शक्तींना आव्हान देईल, एका भक्कम पायावर अभेद्यपणे उभा राहील आणि संपूर्ण जगाला सिद्ध करून दाखवेल की आपण या महान राष्ट्राचे पुत्र आहोत. केवळ याच मार्गाने आपण यशस्वी होऊ शकतो.

श्रीगुरुजींचा विश्वास होता की, काम करण्याचा निश्चय करा, लोकांपर्यंत पोहोचा, त्यांच्याशी संपर्क साधा आणि एक अशी मजबूत संघटना उभारा जी कोणत्याही परिस्थितीत अढळ राहील. खांद्याला खांदा लावून काम करा. पुढे चला, पुढे जात राहा. वेळ वाया घालवू नका. प्रत्येक व्यक्तीला संघटित करा आणि संघटनेच्या माध्यमातून राष्ट्राची उभारणी करा. तुमच्यामध्ये सळसळता उत्साह, धैर्य आणि संकटांना तोंड देऊन यश मिळवण्याची शक्ती आहे. पुढे जात राहा, भविष्य उज्ज्वल आहे.

श्रीगुरुजींचा विश्वास होता की केवळ धाडसी तरुणच राष्ट्राचा उत्कर्ष करू शकतात. केवळ आजच्या तरुणांमध्येच सुखोपभोगाची प्रवृत्ती सोडून आणि राष्ट्राच्या हिताची सेवा करण्याची निःस्वार्थ वृत्ती अंगीकारून राष्ट्राच्या उत्कर्षाचे हे कार्य साध्य करण्याचे धैर्य असू शकते.

संघ आणि मातृशक्ती

१९३१ मध्ये एका महिलेने डॉ. हेडगेवार यांना विचारले, तुम्ही हिंदू समाजाच्या संघटनेविषयी बोलत आहात, पण तुम्ही ५० टक्के महिलांना वगळले आहे. त्यावर डॉ. हेडगेवार म्हणाले, तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे, पण सध्याचे वातावरण पुरुषांना महिलांसोबत काम करण्यासाठी अनुकूल नाही. यामुळे अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण होऊ शकतात. त्यानंतर 'राष्ट्र सेविका समिती' नावाची संघटना स्थापन झाली. आज ती एक देशव्यापी संघटना बनली आहे. पुरुषांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि महिलांसाठी राष्ट्र सेविका समिती. दोन्ही समांतरपणे काम करतील. त्या एकमेकांच्या क्षेत्रात काम करणार नाहीत; त्या नेहमी एकमेकांना मदत करतील.

संघ आणि सामाजिक समरसता

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत सामाजिक समरसतेवर भर देताना म्हणतात, आपण जेथे राहतो, जिथे संवाद साधतो, प्रवास करतो, भेटतो, बसतो, कार्यालय आणि वस्ती, तिथे राहणारे सर्व प्रकारचे लोक आपलेच आहेत. आपण संपूर्ण समाजाला एकच मानतो, पण समाजात लोक प्रकार, जाती आणि पंथ मानतात. जातीय विषमतेची समस्या आहे. सर्व प्रकारच्या लोकांना वैयक्तिक मित्र असले पाहिजेत. त्यांची कुटुंबे एकमेकांचे मित्र असले पाहिजेत. त्यांचे येणे-जाणे, वारंवार भेटणे, सणांच्या वेळी सुख-दुःखात सहभागी होणे, हे सर्व चालू राहिले पाहिजे. (डॉ. मोहनजी भागवत साक्षात्कार : १०० वर्ष की संघ यात्रा - नए क्षितिज, सुरुचि प्रकाशन, पृष्ठ ४८)

महत्त्वाचे टप्पे

संघकार्याचा हा शतकभराचा प्रवास चार प्रमुख टप्प्यांत पार पडला आहे. पहिला टप्पा संघाच्या स्थापनेपासून ते भारताच्या स्वातंत्र्यापर्यंतचा मानला जातो. ज्या दरम्यान स्वयंसेवकांनी वैयक्तिक पातळीवर चालू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीत, समाजसेवेत आणि समाज परिवर्तनात भाग घेतला, परंतु एक संघ म्हणून त्यांचे संपूर्ण लक्ष संघटनेवर केंद्रित होते.

हा संघ कार्याचा चौथा टप्पा सुरू आहे, ज्यामध्ये प्रत्येक स्वयंसेवक आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार समाज परिवर्तनासाठी सक्रिय होतो. डॉ. हेडगेवार म्हणाले होते, 'संघ कार्य केवळ शाखांपुरते मर्यादित नाही; संपूर्ण हिंदू समाज हेच त्यांचे कार्यक्षेत्र आहे.'

पुरुषांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाखा हे केंद्रबिंदू आहेत, तर राष्ट्र सेविका समिती महिलांसाठी तेच कार्य करते. स्वयंसेवक, महिला आणि पुरुष हे सेवा, संपर्क आणि प्रसिद्धी विभागांसह धार्मिक जागृती, ग्रामविकास, कुटुंब प्रबोधन, समसरता, गोसंरक्षण आणि पर्यावरण यांसारख्या ३२ हून अधिक क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे सक्रिय आहेत.

पंच परिवर्तन

संघाचा अनुभव आहे की, समाज परिवर्तनाचे महान कार्य केवळ काही व्यक्तींच्या मदतीने नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या सामर्थ्यानेच शक्य आहे. म्हणूनच, येत्या काही वर्षांसाठी संघाने समाज परिवर्तनाची संकल्पना पंच परिवर्तन म्हणून समग्रपणे मांडली आहे.

सामाजिक समरसता : समरसता हे हिंदू समाजाचे नैसर्गिक वैशिष्ट्य राहिले आहे. तथापि, कालांतराने जातीयवाद, भेदभाव आणि अस्पृश्यता यांसारख्या विकृती निर्माण झाल्या. ज्यामुळे समाजातील काही घटकांना अन्याय आणि अपमानाला सामोरे जावे लागले. आज ही वाईट प्रथा अस्वीकार्ह आहे आणि तिचे निर्मूलन करणे अत्यंत आवश्यक आहे. संघ आग्रह करतो की, समाजातील प्रत्येक जण समान आहे या भावनेने सर्वांना एकत्र करून ऐक्य प्रस्थापित केले पाहिजे.

पर्यावरण संरक्षण : मानवी जीवन पंचमहाभूतांवर (पृथ्वी, पाणी, वायू, अग्नी आणि आकाश) आधारित आहे. या घटकांच्या असंतुलनामुळे आजची पर्यावरणीय आव्हाने निर्माण झाली आहेत. भारतीय परंपरेतील वृक्ष, वनस्पती आणि निसर्गाप्रति आदराची भावना हाच पर्यावरण संरक्षणाचा खरा पाया आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता आणि ऊर्जा संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये आहेत.

कुटुंब प्रबोधन : कुटुंब हे समाजातील सर्वांत लहान पण सर्वांत प्रभावी एकक आहे. ऋग्वेद आणि अथर्ववेदात कुटुंबाला सुख आणि समृद्धीचे केंद्र म्हटले आहे. कुटुंबात हिंदू जीवनशैली, मूल्ये आणि कर्तव्ये जोपासल्याने आपण वसुधैव कुटुंबकम ही भावना जिवंत ठेवतो. संघाचा विश्वास आहे की केवळ एक निरोगी कुटुंबच एक निरोगी समाज आणि एक मजबूत राष्ट्र घडवू शकते.

स्व-आधारित जीवन : परकीय गुलामगिरीतून स्वतःला मुक्त करण्यासाठी आपली स्वतःची भाषा, वस्त्रे, संस्कृती आणि स्वदेशी उद्योगांवर भर देणे आवश्यक आहे. आत्मनिर्भरतेचा अर्थ जगापासून अलिप्त राहणे नव्हे, तर आत्मसन्मानाने व्यापार आणि उत्पादन करणे हा आहे. संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील आत्मनिर्भर भारत- जसे की डीआरडीओ, इस्रो, परम सुपरकॉम्प्युटर आणि कोविड लस यांची उदाहरणे हे आत्मनिर्भर जीवनासाठी प्रेरणादायी आहेत. स्थानिक आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देऊन आपण रोजगार आणि आत्मनिर्भरता दोन्ही वाढवली पाहिजे.

नागरी कर्तव्ये : संविधान आपल्याला हक्क देते, पण त्याचबरोबर मूलभूत कर्तव्यांचीही शिकवण देते. देशभक्ती केवळ महत्त्वाच्या प्रसंगीच नव्हे, तर दैनंदिन वर्तनातूनही प्रतिबिंबित झाली पाहिजे. पाणी आणि विजेची बचत, इंधनाचा विवेकपूर्ण वापर, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सौजन्य हीदेखील राष्ट्रीय सेवाच आहे. सुजाण आणि जबाबदार नागरिक हे कोणत्याही देशाच्या आंतरिक सामर्थ्याचा आणि शाश्वत विकासाचा पाया असतात. ■

(विचार विनिमय न्यास, दिल्ली)

श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

विजयादशमी सीमोल्लंघन

दहावी माळ

भारतीय संस्कृतीत साडेतीन मुहूर्तांची एक मंगल आणि पवित्र संकल्पना प्रचलित आहे. हे साडेतीन मुहूर्त कोणत्याही शुभ कार्यासाठी अत्यंत पवित्र व सिद्ध मानले जातात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया आणि विजयादशमी (दसरा) हे तीन पूर्ण मुहूर्त, तर दिवाळी पाडवा हा अर्धा मुहूर्त मानला जातो.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने विजयादशमीचा सण हा निसर्ग, शेती आणि मानवी जीवनाशी अतूटपणे जोडलेला आहे. या काळात शेतीतून नवीन धान्य, फळे आणि पिकांची निर्मिती होण्यास प्रारंभ झालेला असतो. पावसाळा संपून नवीन ऋतुमानाची चाहूल लागलेली असते. हिवाळ्याची आल्हाददायक चाहूल जाणवू लागते आणि अशा प्रसन्न शरद ऋतूच्या वातावरणात विजयादशमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या भक्ती, उपासना आणि आराधनेनंतर सर्वधर्मीयांच्या लाडक्या आदिमातेचे जागरण, गोंधळ आणि विविध धार्मिक विधी अनुभवायला मिळतात. मानवी अहंकाराचा नाश व्हावा म्हणून देवीकडे 'जोगवा' मागितला जातो. सुख-समृद्धीचे प्रतीक असलेली कवड्यांची माळ परिधान करून पोतराज स्वतःला फटके मारतो आणि त्यातून आपल्या पूर्वसुकृताची तसेच देवीप्रति असलेल्या भक्तीची आठवण करून देतो. आईच्या विविध शौर्यकथा सांगत गोंधळी जागरण घालतात.

अशा भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात पूर्वीच्या काळी राजे आणि सैनिक आपल्या पराक्रमासाठी शस्त्रसज्ज होत असत. महाभारतातील कथेनुसार, बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास संपल्यानंतर पांडवांनी शमी वृक्षावर लपवून ठेवलेली आपली शस्त्रे बाहेर काढली आणि विजयादशमीच्या दिवशी ती धारण करून विराटनगरातून प्रकट झाले. त्यामुळे विजयादशमीला शस्त्रपूजन आणि सीमोल्लंघनाची परंपरा रूढ झाली.

प्रभू श्रीरामांनी याच दिवशी असुरराज रावणाचा वध करून धर्माचा अधर्मावर विजय प्रस्थापित केला, अशी श्रद्धा आहे. तसेच देवीने महिषासुराचा वध करून समाजमनाला त्याच्या अत्याचारातून मुक्त केले, अशीही पौराणिक कथा आहे. म्हणूनच विजयादशमी हा पराक्रम, शौर्य, शक्ती आणि धर्माचा अधर्मावर विजय यांचा प्रतीकात्मक पर्वकाळ मानला जातो.

या भक्ती-शक्तीचा जागर असलेल्या पर्वकाळात आजही ग्रामीण भागात, विशेषतः मातंग समाजातील महिला, सकाळच्या वेळी घरोघरी जाऊन आईचा जोगवा मागतात. आपल्या कुळाचारानुसार देवीला नैवेद्य दाखवण्याचा मानही या महिलांना दिला जातो. त्यांच्या हस्ते पात्रपूजन झाल्याशिवाय हा उत्सव पूर्ण होत नाही, अशी अपार श्रद्धा आजही अनेक ठिकाणी मोठ्या भक्तिभावाने जपली जाते.

नवरात्रातील या परंपरेत सकाळी जोगवा मागताना म्हटले जाणारे लोकगीतही सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडवते-

आई ही तुळजा, बाळ ही तुळजा,
देवा देवीच्या भोवती गोंधळ घालिती ।
आई बसली नवरती, दहा दिवसांची भरती ।
पाटील, पांडे यामिळूनीं, गाव लोकया मिळुनी,
सीमोल्लंघनासी जाती ।
धानाची तुरे लेती ।
आईला उत्तकार घालिती
सोने घेऊन घरा येती ।
आल्या मांगिनी, जोगिनी,
हाती कुंकवाचा करंड ।
भांग भरला मोत्यांनं, मळवट भरलं कुंकवानं ।

अशा लोकगीतांमधून केवळ देवीभक्तीच नव्हे, तर लोकजीवनातील सामाजिक रीतिरिवाज, परंपरा, श्रद्धा, सांस्कृतिक एकोपा आणि सर्व जाती-धर्मांना एकत्र बांधणारी समन्वयाची भावना यांचेही सुंदर दर्शन घडते.

विजयादशमी म्हणजे केवळ सीमोल्लंघनाचा दिवस नव्हे, तर मनातील अहंकार, मत्सर, द्वेष आणि नकारात्मकतेच्या सीमा ओलांडून सत्य, सदाचार, भक्ती, शौर्य आणि मानवतेच्या मार्गावर पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच हा सण भारतीय संस्कृतीतील विजय, शक्ती आणि मंगलतेचे प्रतीक म्हणून आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने साजरा केला जातो. ■

उमरखेड. ९४०३६०८११५

वाचक पत्र

दुष्ट प्रवृत्तींचा नाश व्हावा

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला विजयादशमी सण आज देशभरात अपूर्व उत्साह आणि मंगलमय वातावरणात साजरा होत आहे. पौराणिक कथेमध्ये विजयादशमीला एक वेगळे महत्त्व आहे. चामुंडा देवीने महिषासुर राक्षसाशी युद्ध करून दसऱ्याच्या दिवशी त्याचा वध केला. प्रभू रामचंद्राने नऊ दिवस उपवास करून शक्तीची म्हणजे देवीची उपासना केली आणि त्या देवीच्या उपासनेने जी शक्ती प्राप्त झाली त्यातून रावणाचा वध केला व या दिवशी विजय मिळाला म्हणून विजयादशमी साजरी करण्याची ऐतिहासिक परंपरा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत अजूनही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले आहे. आणि त्यांचे जीवन दुःख, वेदना, समस्या आणि संघर्ष अशा कष्टप्रद घटनांनी भरलेले आहे. स्त्री शक्तीचा अपमान व अवहेलना थांबविण्याचे काम प्रत्येक पुरुषाने पिता व भ्राता होऊन केले पाहिजे. या कलियुगात स्त्रियांनी चामुंडा देवीचा अवतार घेऊन अन्याय, अत्याचार आणि दुष्ट प्रवृत्तीचा संहार केला पाहिजे. ■

प्रा. मधुकर चुटे/९४२०५६६४०४

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

क्रीडा वृत्त...



शालेय हँडबॉल; इंडियन मॉडेल स्कूल विजेता

सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर -

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्ड संघाने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. राजीव गांधी स्टेडियम येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात त्यांनी सुयश विद्यालयावर ७-१ अशी एकतर्फी मात केली. संघास क्रीडा शिक्षक अक्षय माने, वैष्णवी गडदे, प्रशिक्षक ऋषिकेश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए.डी.जोशी सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले. विजयी संघ : सार्थकी कोळेकर, वैष्णवी मात्रे, दर्शिका दुलंगे, अन्नपुर्णा माड्याळ, सुप्रिया म ेरे,अनुजा बहाळस्कर, श्रुती काळे, अनन्या वाळुजकर, अनुष्का जाधव, तेजश्री फुलारी.

जिल्हा ॲथलेटिक्स संघ निवड चाचणी गुरुवारी पंढरपुरात

सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर-

धाराशिव तालुक्यातील पाच गावांमध्ये सात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.यामध्ये कोडगाव (बावी) येथे एक, कजरखेडा येथे एक,बोरखेडा येथे एक,पळसप येथे तीन आणि नांदुर्गा येथे एक टँकर सुरू आहे. उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे दोन,बलसूर येथे एक आणि आनंदनगर येथे एक,असे चार टँकर सुरू आहेत. लोहारा तालुक्यातील सास्तूर येथे एक टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तुळजापूर, कळंब, भूम, वाशी आणि परांडा या पाच तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू नाही.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी २८६ विहिरींचे अधिग्रहण

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रशासनाने खासगी विहिरींच्या अधिग्रहणावरही भर दिला आहे. जिल्ह्यात एकूण २८६ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून,त्यापैकी नऊ विंधन विहिरी टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी,तर २७७ विहिरी टँकरव्यतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

संक्षिप्त...

राजमाता स्कूलमध्ये चिमुकल्यांचा उत्साह शिगेला



तभा वृत्तसेवा

शिरूरआनंतपाळ दि. १९ ऑक्टोबर : येथील पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ताल आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद. अशा उत्साहपूर्ण वातावरणात शिरूर अनंतपाळ येथील राजमाता प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया रास कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या नृत्यकौशल्याची सुंदर झलक सादर केली.

नवरात्रोत्सवातील सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख परिधान केले होते. संगीताच्या तालावर हातातील दांडिया फिरवत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. चिमुकल्यांचा उत्साह, त्यांचे सुंदर सादरीकरण आणि नृत्यातील समन्वय यामुळे उपस्थितांचे लक्ष वेधले गेले

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सण-उत्सवांचे महत्त्व समजावे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा आणि कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने शाळेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शालेय जीवनात अशा सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्वाचे स्थान असून, त्यातून विद्यार्थ्यांना स्वतःमधील कलागुण सादर करण्याची संधी मिळते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे संचालक देवकुमार घोरपडे, संचालक आकाश चाकोते तसेच शिक्षिका धुमाळे मॅडम, चाकोते मॅडम आणि मोरे मॅडम यांनी नियोजन व आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

'अनुलोम'च्या बैठकीत ग्रामीण विकासावर मंथन गाळयुक्त शिवार अभियानासह सामाजिक उपक्रमांच्या नियोजनावर चर्चा



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ ऑक्टोबर : अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्थेच्या वतीने देवणी येथे अनुलोम मित्रांची बैठक झाली. या बैठकीत संस्थेच्या सामाजिक उपक्रमांचा आढावा घेण्यासह गाळयुक्त शिवार अभियान, शासकीय योजनांची जनजागृती आणि ग्रामीण विकासाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीस अनुलोमचे निलंगा भाग जनसेवक अमोल भोसले यांच्यासह देवणी तालुक्यातील अनुलोम मित्र उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणे आणि लोकसहभागातून विकासकामांना चालना देण्याबाबत यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

गाळयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जलसंधारणाच्या कामांना प्रोत्साहन देणे, तसेच आगामी काळात सामाजिक उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण विकासासाठी समन्वयाने कार्य करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.या बैठकीस ज्ञानेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर सगर, राम पटवारी, राजकुमार रोटे, माधव जाधव, सतीश कांबळे, अभंग सूर्यवंशी, निवृत्ती कारभारी, श्याम गगनबोने, किशोर बिरादार, जयद्रथ सह्याद्री, सुनील पाटील यांच्यासह अन्य अनुलोम मित्र उपस्थित होते.

आई बाबा फाउंडेशनच्या वतीने मोफत पाणपोई

तभा वृत्तसेवा

किनगाव दि.१७ ऑक्टोबर : येथील बस स्थानकातील प्रवाशांसह चालक व वाहनधारकांचे पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होत असल्याने येथील आई-बाबा फाउंडेशन च्या वतीने मोफत पाणपोई चालू करण्यात आली आहे. सध्या अशा भीषण काळात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने किनगाव बस स्थानकात पानपोळी चालू केल्यामुळे प्रवाशांनी आई-बाबा फाउंडेशनचे आभार मानले आहेत.

या पानपोईचे उद्घाटन सेवानिवृत्त पोलीस सिद्धेश्वर मुरकुटे व चेअरमन संग्राम चामे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आई-बाबा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आदित्य चिकटे, कृष्णा यमते , विनायक दळवी, वाहतूक नियंत्रक कपिल रब्बेवार, महेश फड, मुबारक पठाण, याकूब मोमीन, जरीना शेख , मनीषा राठोड , ग्रामस्थ व प्रवासी उपस्थित होते.

गाड्या धुण्याचा नाही तर शस्त्र पूजनाचा सण विजयादशमी : व्यंकट दशरथ

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ ऑक्टोबर : आपण आपली परंपरा विसरत चाललो आहोत विजया दशमी हा उत्सव शस्त्र पूजनाचा आहे . गाडी धुणे सजविण्याचा नाही . आपल्या सर्व देवता या शस्त्र सज्ज आहेत . आपल्याला शक्य असेल त्या शस्त्राची पूजा करून विजयादशमी सण साजरा केला पाहिजे , यामुळे प्रत्येक शाखेवर त्या त्या भागातील नागरिकांना एकत्रित करून शस्त्र पूजन करावे असे लातूर विभाग कार्यवाह व्यंकट दशरथ यांनी सांगितले .

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ छत्रपती संभाजी महाराज नगर उदगीर मार्फत लाल बहादूर शास्त्री विद्यालयात (ता.१७) शनिवारी आयोजित शस्त्र पूजन कार्यक्रम घेण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर संघचालक लक्ष्मीकांत रायेवार तर प्रमुख पाहुणे म्हणून दशरथ हे होते .

पुढे बोलताना दशरथ यांनी सांगितले की साधारण ३० वर्षापूर्वी पिठाची गिरणी बंद पाडण्याचे आंतर्राष्ट्रीय कारस्थान घडले होते . यासाठी अधिकारी आणि काही खासदारांना हाताला धरून नियम आणण्यात येत होता की गहू , ज्वारी , डाळी साठी वेगवेगळी गिरणी असली पाहिजे , यामुळे प्रत्येकाला ४/५ वेगवेगळ्या गिरण्या ठेवणे शक्य नसल्याने पिठाच्या गिरणी बंद पडतील आणि या कंपन्याचे रेडीमेड पीठ विकले जाईल .. या नियमा मागे असलेल्या अधिकारी , खाजदार यांची माहिती घेतली गेली आणि हा नियम सर्वोच्च न्यायालयाच्या मदतीने रद्द करण्यात आला होता . आता पुन्हा आंतरराष्ट्रीय कारस्थानाची सुरुवात झाली आहे फक्त आता ते वेगळ्या रूपात असे कारस्थान करीत आहेत ते ओळखले गेले पाहिजे असे सांगितले .

ग्रामीण भागात मंडळ स्थापन करून गावातील एक टक्के तर शहरातील तीन टक्के स्वयंसेवक तयार करणे लक्ष असल्याचे सांगितले . उदगीर शहरात ४० वसती शाखा सुरू करण्यात आल्या आहेत असेही त्यांनी सांगितले .

चिन्मय बांसवाडकर यांनी वयक्तिक पद्य तर चेतन पाटील यांनी सामूहिक पद्य म्हटले . संघाच्या पार्थने नंतर कार्यक्रमाची सांगता झाली . यावेळी कृष्णा बोयेनवाड, यशवंत बारस्कर , अमोल निडवदे ,रमाकांत चटनाळे , अमोल अंनकळे, दिनेश देशमुख , एकनाथ राऊत , प्रा.भंडे ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांच्यासह स्वयंसेवक हजर होते .

लाखाच्या दुखण्याला पाच हजाराचे अग्रीम मलम....?

दुष्काळाचे दिवाळीवर आर्थिक संकट

सुधीर गंगणे
तभा वृत्तसेवा

ओसा दि. १९ ऑक्टोबर : सलग दोन वर्षांतील अतिवृष्टीच्या नुकसानी नंतर यावर्षीच्या खरिप हंगामात अल निनोच्या संकटाने राज्य व केंद्र सरकारला थेट बांधावर येण्यास भाग पाडले. या दरम्यान सरकारने दुष्काळ जाहीर करून भरीव मदत करण्याचे आश्वासन देत नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे केले.यावेळी या भीषण नैसर्गिक संकटातून बाहेर पडण्यासाठी एकरी एक लाख रूपयांची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने अनेक संघटनांनी निवेदनाच्या माध्यमातून केली. तर सरकारने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळी सण साजरा करता यावा.म्हणुन पाच हजार रूपयांची मदत जाहीर केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एक लाख रूपयांच्या मागणीच्या दुखण्याला पाच हजार रूपयांचे अग्रीम मलम....? अशी चर्चा होताना दिसत आहे.



गेल्या दोन वर्षांपासून अतिवृष्टीने खरिप हंगामातील पिकांचे ऐण काढणी दरम्यान नुकसान होऊन उत्पादनात घट झाली होती. निसर्गाच्या या अवकृपेत सापडलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामात या अतिरिक्त पावसाचा फारसा फायदा झाला नाही. सततच्या नैसर्गिक दुष्टचक्रात गेल्या सात आठ वर्षापासून खाजगी व बँकाच्या थकित कर्जात या दोन वर्षांच्या नुकसानीची अधिकची भर पडली.यामुळे यंदा खरिप हंगामातील पेरणी कशी करावी. याची मोठी चिंता शेतकऱ्यांना होती.अशा नैसर्गिक संकटाच्या फेऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी राज्य सरकारने गेल्या खरीप हंगामात पीक विमा १७ हजार ५०० रूपये हेक्टरी देणार असल्याचे जाहीर केले होते. आणि विमा मिळेल. अशी भर या काळातील बातम्यांनी टाकली. विमा मिळणारच या आशेने शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या वायद्यावर पेरणीसाठी जुळवाजुळव करीत नव्याने कर्ज घेतले.या कर्जाच्या वाढत्या बोज्याच्या ओझ्याखाली सातबारा उर्ताऱ्याची मान यंदा चांगलीच अडकली.

या वाढलेल्या कर्जाचा भार कमी करण्यासाठी शेतकरी पहिल्या नक्षत्रातील मोसमी पावसाची वाट पाहत असतानाच जुन महिन्यात पावसाचे आगमन झाले. अल निनो च्या चर्चेनंतर पाऊस होत असल्याने शेतकऱ्यांनी पुढील पावसाच्या आशेवर औसा तालुक्यातील शेतकऱ्यांनी तूर ६ हजार ७९०, उडीद ७४५, मुग६५४ तर वर्षांतील नगदी पीक सोयाबीनची ९२ हजार ६१६ हेक्टर अशी खरीप हंगामात १ लाख १ हजार ७०६ हेक्टरावर पेरणी केली.पेरणीनंतर अपेक्षेप्रमाणे पाऊस पडला नसला तरी पिके हिरवीगार राहतील एवढा जेमतेम पडला. यामध्ये कोणत्या मंडळात कमी तर कोणत्या मंडळात अधिक झाला खरा. पण पिकांना याचा फारसा फायदा झाला नाही.पाऊस पडेल या आशेवर शेतकऱ्यांनी फवारणी,कोळपणी,खुरपणी अशी हंगामातील सर्व आंतरमशागतीची कामे केली. परंतू ज्या अपेक्षेने पेरणी केली. त्या अपेक्षेप्रमाणे पिकांच्या झाडाला लागण दिसत नव्हती. आणि यात पुन्हा एकदा पावसाने महिनाभराहून अधिकची उघाडीप दिली.

पावसाच्या उघाडीपीत उडीद,मुग हातातून कधीं निसटले हे शेतकऱ्यांना कळलेच नाही. यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीनकडे आपला मोर्चा वळवला.पाऊस नसल्याने उपलब्ध पाणी देऊन उत्पादन मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न रखरखत्या उन्हाने हाणून पाडला. जिथं १२ते १५ क्विंटलचे उत्पादन होत होते. तिथं १०० किलोचे उत्पादन होईना.यंदाच्या हंगामात पाऊस कमी आणि रखरखते ऊन जास्त असल्याने विहीरीनी तळ गाठला. तर ४००-५०० फुटातील विंधन विहिरीनी उचक्या देण्यास सुरुवात केली. यामध्ये अनेक पाणी साठे कोरडे पडले.अंगाची लाही लाही करर्णाया उन्हाने सोयाबीन जाग्यावर करपले. अनेक सोयाबीनच्या फंडात शेंगा होत्या पण दाणा भरला नाही. अनेक सोयाबीनच्या शेंगा व फुले अपुऱ्या ओली अभावी गळून पडली. अशा बिकट संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची हाक सरकारपर्यंत पोहोचल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तालुक्यातील खरोसा येथील पिकांची पाहणी केली. तसेच निलंगा तालुक्यातील जाऊ येथील पिकांची पाहणी केली.याचबरोबर आ. अभिमन्यू पवार यांनी तालुक्यासह मतदारसंघातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.यावेळी मुख्यमंत्री यांनी दोन दिवसांत दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले होते. दुष्काळ जाहीर झाला.याकाळात तालुक्यात मातोळा येथील जिल्हा परिषद सदस्या दीपाली रामभाऊ भोसले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून आवाज उठवला.यानंतर एम आय एम, संभाजी ब्रिगेड संघटना,मनसे,काँग्रेस, राष्ट्रवादी यांनी आंदोलन करून तर छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे पाटील यांनी उपोषण केले. आंदोलन कर्त्यांनी शेतकऱ्यांना एकरी एक लाख रूपयांचे अनुदान, जनावरांना चारा,थकितसह यावर्षीचा पीक विमा व मजूरांच्या हाताला काम देण्याच्या प्रमुख मागण्या केल्या होत्या. सत्ताधाऱ्यांची पाहणी आणि विरोधकांच्या मागणीमुळे या वर्षी झालेल्या नुकसानीचा व थकितसह यंदाचा पीक विमा, अनुदान दिवाळी पुर्वी मिळेल. अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती.परंतू राज्य सरकारने दिवाळी सण शेतकऱ्यांना साजरा करता यावा.यासाठी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर केली.या मदतीमुळे सत्ताधाऱ्यांतच खदखद सुरू झाली आहे. तर पाच हजार रूपयात वर्षांतील सर्वात मोठा सण दिवाळी कसा साजरा करावा. असा भयावह प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. तर राज्य सरकारच्या या मदतीच्या मुद्यावर विरोधक पुढील आंदोलनाच्या तयारीला लागले आहेत.मात्र एकरी लाखाच्या दुखण्याला पाच हजार रूपयांचे अग्रीम मलम सरकारने लावले असल्याचा सूर आता गावकऱ्यांतून दिसत आहे. तर आगामी काळात हाच कळीचा मुद्दा सत्ताधाऱ्यांसाठी घातक ठरणार असल्याचा अंदाज राजकीय वर्तुळातून समोर येत आहे.

रसिका महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन संपन्न

तभा वृत्तसेवा

देवणी दि. १९ ऑक्टोबर : येथील कै. रसिका महाविद्यालयात माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाचन चळवळीस प्रेरणा मिळावी व प्रत्येक वाचकास त्यांचा ग्रंथ मिळावा या ग्रंथालय शास्त्राच्या सूत्राची पूर्तता होण्याच्या दृष्टिकोनातून १५ ऑक्टोबर २०२६ रोजी ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सदरील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचलन उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले. प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी प्रत्येक प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आप आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने वायफळ खर्च न करता शालेय ग्रंथालय, सार्वजनिक वाचनालय किंवा महाविद्यालय ग्रंथालयास ग्रंथ भेट देवून वाचन संस्कृती वृद्धिंगत करावे असे आवाहन केले. यावेळी डॉ.प्रशांत भंडे यांनी सर्वांनी दररोज वाचन करणे काळाची गरज असल्याचे आपल्या भाषणात सांगितले. डॉ.गोपाल सोमानी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी वृंद, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी घेतला. ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी दयानंद रणदिवे, संतोष मुळे, विठ्ठल बिरादार आणि शंकर म्हेत्रे यांनी परिश्रम घेतले.



केंद्रे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची सुंवर्ण झेप



तभा वृत्तसेवा

जळकोट दि. १९ ऑक्टोबर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व के के एम मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील खेळाडू केंद्रे रमाकांत संभाजी या खेळाडूने तिहेरी उडी मध्ये सुंवर्ण पदक प्राप्त केले. तसेच उंच उडी मध्ये (सिल्वर मेडल) प्राप्त करून निविर्वाद आपले वचर्स्व निर्मान केले. आहे .चमकदार कामगीरी करणाऱ्या सदरील या खेळाडूना क्रिंडा संचालक डॉ तातेराव केंद्रे सराचे अनमोल मार्गदर्शन लाभले आहे .

या यशाबदल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मानवेंद्र केद्रे , संस्थेचे अध्यक्ष डॉ भागवत मानवेंद्र केंद्रे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी . लहाने

उपप्राचार्य डॉ व्यंकट पाटील ,अनिल केंद्रे , क्रिडा समितीचे सर्व पदाधिकारी तथा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या दैदिप्यमान कामगिरी केल्याबदल संघाचे प्रशिक्षक क्रिडा संचालक तथा मार्गदर्शक प्रा डॉ तातेराव केंद्रे सर आणि विजयी खेळाडू मुले आणि मुलीचे अभिनंदन करून पुढील उज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .

दिवाळीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी भरारी पथके स्थापन करा

जिल्हाधिकाऱ्यांकडे अ. भा. ग्राहक पंचायतीची निवेदनाद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

चाकूर : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये ग्राहकांची होणारी संभाव्य फसवणूक रोखण्यासाठी लातूर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन आणि वैधमापनशास्त्र विभागाची संयुक्त भरारी पथके स्थापन करून तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले-पाटील आणि सदस्य विवेकानंद वाडीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दिवाळी काळात मिठाई, खाद्यपदार्थ, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीत मोठी वाढ होते. या काळात व्यापाऱ्यांकडून लकी ड्रॉ, गिफ्ट कूपन, आकर्षक बक्षिसे आणि सवलत योजनांच्या नावाखाली ग्राहकांना आकर्षित केले जाते. मात्र अनेक ठिकाणी अटी-शर्ती स्पष्ट न करणे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, बक्षिसाचे आमिष दाखवून खरेदीस प्रवृत्त करणे आणि बक्षीस वितरणात पारदर्शकता न ठेवणे यातून ग्राहकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

तसेच मिठाई व खाद्यपदार्थांची गुणवत्ता, वजनात घट, पॅकबंद वस्तूंवरील एमआरपी, निव्वळ वजन, उत्पादन व कालबाह्य दिनांक, वजन-काटे यातील गैरप्रकार यावर प्रशासनाने लक्ष ठेवावे. शहरी व ग्रामीण बाजारपेठा, दुकाने, शॉपिंग सेंटरची नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाई करावी.

ग्राहकांच्या तक्रारीसाठी स्वतंत्र संपर्क व्यवस्था सुरू करावी, तक्रारींची तातडीने दखल घ्यावी आणि केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तरुण भारत Solapur Tarun Bharat
छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

औसा शिक्षक पतसंस्थेचा आर्थिक यशाचा नवा विक्रम

सभासदांना सलग चौथ्या वर्षीही ९ % लाभांश वाटप

तभा वृत्तसेवा

औसा दि. १९ ऑक्टोंबर : सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि सभासदहिताला प्राधान्य देणारे धोरण यांच्या बळावर औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून संस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने तब्बल १ कोटी ६७ लाख ८६ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे.त्यामुळे सभासदांना सलग चौथ्या वर्षीही ९ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतर पतसंस्थांच्या तुलनेत सर्वाधिक लाभांश देण्याची परंपरा कायम राखत संस्थेने आपल्या यशस्वी वाटचालीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. सभासदांच्या लाभांशाची रक्कम त्यांच्या एसबीआय, एलडीसीसी तसेच इतर बँकांमध्ये खाते असलेल्या सभासदांच्या बँक खात्यांवर थेट रक्कम जमा करण्यासाठी धनादेश व बँक यादी दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या औसा शाखेचे व्यवस्थापक प्रणील पीचे यांच्याकडे संस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांनी सुपूर्द करून आजच सभासदांच्या बँक खात्यावर लाभांश रक्कमा जमा करण्यात आल्या. यावेळी व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, बँकेचे फिल्ड ऑफिसर जी. आर. भाटकर, इन्स्पेक्टर एस. डी. माळी आदी उपस्थित होते



औसा शिक्षक पतसंस्थेने दि. ०१ जानेवारी २०२३ पासून कर्जाचा व्याजदर बँकेपेक्षा एक टक्का कमी ठेवून १५ लाख रु. कर्ज ९.५०% व्याजदराने वितरण करत मागील तीन वर्षाप्रमाणे सलग चौथ्या वर्षीही ९% लाभांश सभासदांना वाटप केला आहे. संस्थेने १ ऑक्टोबर २०२६ पासून दीर्घ कर्ज २० लाख रु. व आकस्मित कर्ज ८० हजार रु. वाटप सुरु केले आहे. दसरा सणापूर्वी अनेक सभासदांना २७ हजार रुपया पर्यंतच्या लाभांशाच्या रक्कमा सभासदांच्या बँक खात्यांवर जमा झाल्यामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सणासुदीच्या काळात मिळालेल्या या आर्थिक लाभामुळे सभासदांना मोठा दिलासा मिळाला आहे. संचालक मंडळाने सभासदाच्या विश्वासाहतेमुळे संस्थेत आजरोजी ठेव रु. १५ कोटी, आर.डी. रु. ५ कोटी १८ लाख, भाग भांडवल रु.१५ कोटी १० लाख, कर्ज जीवन हमी रु. ३ कोटी ३१ लाख इत्यादी जमा करून बँकेचे कॅश क्रेडिट कर्ज निरंक करून व संस्थेला स्वबळावर आणले आहे.

सलग चौथ्या वर्षी ९ टक्के लाभांश, कोट्यवधी रुपयांचा निव्वळ नफा, कॅश क्रेडिट कर्जातून मुक्तता आणि सभासदांसाठी वाढविण्यात आलेल्या कर्जमर्यादा यांमुळे औसा शिक्षक पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. सभासदांचा विश्वास जपत संस्थेची ही यशस्वी वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. औसा शिक्षक पतसंस्थेच्या या यशस्वी वाटचालीत संस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी आणि सभासद यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सभासदांच्या हिताला प्राधान्य देत आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हता या मूल्यांच्या आधारावर संस्थेची प्रगती सुरू आहे. संस्थेच्या वतीने सर्व सभासद आणि हितचिंतकांचे आभार व्यक्त करून सर्वांना आगामी दसरा आणि दिवाळी सणाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

CMYK

धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.१९ ऑक्टोबर -

येथील अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिरात १७ ऑक्टोबर रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व पालक मेळावा उत्साहात पार पडला. जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या, शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या तसेच मंथन परीक्षेत राज्य, जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशी केंद्रप्रमुख सखाराम शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस सहायक निरीक्षक सावंत, गोकर्णा तागडे, करण थोरबोले, नगरसेविका शामल कवडे, संस्थेचे सचिव श्रीधर पवार आणि मुख्याध्यापिका म नीषा माने उपस्थित होते. जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या सुशांत प्रशांत क्षीरसागर आणि पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या सोहमराजे रामहरी जगदाळे यांच्यासह मंथन परीक्षेतील गुणवंतांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार देण्याची जबाबदारी पालकांनी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी क्षीरसागर यांनी केले.

संक्षिप्त वृत्त...



वडगाव काटीत आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते देवीची आरती

धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त तुळजापूर तालुक्यातील वडगाव काटी येथे देवी आईची आरती भक्तिभावाने पार पडली. हलगी, झांज आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात देवीचा जयघोष करण्यात आला. आरतीसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धीसह धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भरभराटीसाठी देवीचरणी प्रार्थना करण्यात आली.



आ. कैलास पाटील यांच्या हस्ते धारासुर मर्दिनी देवीची आरती

धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त धाराशिवकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री धारासुर मर्दिनी देवीच्या मंदिरात भक्तिमय वातावरणात दर्शन व आरतीचा सोहळा पार पडला. आमदार कैलास पाटील यांनी श्री धारासुर मर्दिनी देवीची आरती करून देवीचे आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी आई धारासुर मर्दिनीच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सर्वांच्या जीवनात आनंद व समाधान नांदावे, अशी प्रार्थना केली. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या उपासनेतून श्रद्धा, भक्ती आणि सकारात्मकतेचा संदेश दिला जात आहे. धाराशिवकरांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या श्री धारासुर मर्दिनी देवीच्या चरणी प्रार्थना करून आमदार कैलास पाटील यांनी सर्वांच्या कल्याणाची कामना केली.

अरण्य गोवर्धन मठात शतचंडी यज्ञ; दुष्काळ निवारणासाठी प्रार्थना

तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त अरण्य गोवर्धन मठात दुर्गा सप्तपदी पाठ आणि शतचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले. महंत व्यंकट अरण्य महाराज यांच्या हस्ते होमहवनासह विविध धार्मिक विधी पार पडले. यावेळी महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दूर होऊन शेतकरी आणि सर्वसामान्यांना दिलासा मिळावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली. या धार्मिक विधींमध्ये सुनीत पाठक, राजन पाठक, धनंजय पाठक आणि महेश प्रयाग यांनी सहभाग घेतला. यावेळी शिवाजी अमृतराव, रत्नदीप अमृतराव यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.



तुळजापुरात नशामुक्त जनजागृती रॅली

तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

नशामुक्त भारत अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त तुळजापूर शहरात नशामुक्त जनजागृती रॅली काढण्यात आली. बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रॅलीच्या प्रारंभी कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रवीण भाले यांनी नशामुक्त भारत अभियानाचे महत्त्व विशद केले. महाविद्यालयापासून सुरू झालेली रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी नशेच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यात आली. रॅलीत महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

दुर्गाष्टमीला तुळजाभवानी मंदिरात वैदिक होम-हवनाची पूर्णाहुती!

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सपत्नीक केली पूजा; कोहळा व नारळ अर्पण करून धार्मिक विधी संपन्न...



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) दुर्गाष्टमीनिमित्त मंदिर परिसरातील होमकुंडावर वैदिक मंत्रोच्चारात होम-हवन विधी पार पडला. यज्ञकुंडात कोहळा व नारळ यांची पूर्णाहुती अर्पण करून धार्मिक विधीची सांगता करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांनी पत्नी सौमय्याश्री पुजार यांच्यासह यजमान म्हणून पूजाविधीत सहभाग घेतला.



शारदीय नवरात्र म होत्सवात दुर्गाष्टमीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात वैदिक मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींनी वातावरण भक्तिमय झाले होते. परंपरेनुसार यज्ञकुंडात कोहळा व नारळ यांची पूर्णाहुती देण्यात आली.

दरम्यान, गणेश विहार येथे कोल्हापूर संस्थानच्या वतीने आयोजित होम-हवन विधीत प्रतिपचंद्र प्रयाग व मंदा प्रयाग यांनी, तर हैदराबादच्या रावबहादूर संस्थानच्या वतीने आयोजित विधीत विनीत कोंडो व स्वप्नाली कोंडो यांनी यजमानपद भूषविले.



या प्रसंगी उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, उपाध्ये बंडू पाठक, अनंत कोंडो, रामचंद्र पाटील यांच्यासह पुजारी, सेवेकरी, भाविक आणि मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

घराचे कुलूप तोडून १ लाख १० हजारांची रोकड लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

तालुक्यातील तांदुळवाडी येथे अज्ञात चोरट्याने घराच्या दोन्ही दरवाजांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि धान्याच्या कोठीत ठेवलेली १ लाख १० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान घडली.



रमेश सुखदेव पवार (वय ५०, रा. शेत, गट क्रमांक ५९, तांदुळवाडी, ता. कळंब) यांच्या घरी ही चोरी झाली. याप्रकरणी पवार यांनी १७ ऑक्टोबर रोजी कळंब पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी गावनिहाय सूक्ष्म नियोजन करा!

पालक सचिव डॉ. राजेश देशमुख यांचे निर्देश; प्रत्येक तालुक्यात ४०० एकरांवर चारा लागवडीचे नियोजन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

जिल्ह्यात सलग ४२ दिवस पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने गावनिहाय सूक्ष्म नियोजन करून उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. संभाव्य पाणीटंचाई आणि चाराटंचाई लक्षात घेऊन आतापासूनच तयारी करावी. शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांना दिलासा देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पालक सचिव डॉ. राजेश देशमुख यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात १८ ऑक्टोबर रोजी आयोजित



दुष्काळसदृश परिस्थितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, ज्योती पाटील, निलेश काळे, विजय थोरात आणि विद्याचरण कडवकर उपस्थित होते.

टंचाईग्रस्त गावांचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा, पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन टँकर व पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, तसेच जिल्हा व तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करावेत, अशा सूचना डॉ. देशमुख यांनी दिल्या. शेतकऱ्यांना शासकीय मदत वेळेत मिळण्यासाठी आवश्यक नोंदी अद्ययावत ठेवण्यासह पीकविम्याबाबतही दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. धाराशिव शहराला उजनी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या जलवाहिनीवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. आरओ प्रकल्पांमधून वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठीही उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रत्येक तालुक्यात सुमारे ४०० एकर क्षेत्रावर चारा लागवडीचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. पाण्याची उपलब्धता असलेल्या गाळपेर आणि गायरान जमिनींचा वापर करून अल्प कालावधीत तयार होणाऱ्या चारा पिकांना प्राधान्य द्यावे. येत्या तीन ते चार दिवसांत या कामाला गती देऊन सुमारे ४५ दिवसांत जनावरांसाठी चारा उपलब्ध होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करून आवश्यक निधीची मागणी करावी. पुढील पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे. साठवण तलावांतील गाळ काढून शेतजमिनीवर टाकल्यास जमिनीची उत्पादकता आणि तलावांची पाणीसाठवण क्षमता वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

वृद्ध साहित्यिक-कलावंतांचे ५ हजारांचे मानधन अपुरे; किमान १० हजार वाढ देण्याची मागणी



तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१९ ऑक्टोबर -

राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेंतर्गत वृद्ध साहित्यिक आणि कलावंतांच्या बँक खात्यात दरमहा मिळणारे ५ हजार रुपयांचे मानधन महागाईच्या काळात अपुरे ठरत असल्याची भावना कलावंतांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे शासनाने मानधनात किमान १० हजार रुपयांची वाढ करावी, अशी मागणी होत आहे.

वयाची अनेक वर्षे साहित्य, कला आणि संस्कृतीच्या सेवेत घालविणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना सध्या मिळणाऱ्या मानधनातून दैनंदिन गरजा भागविताना अडचणी येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, औषधोपचार आणि इतर खर्च लक्षात घेता हे मानधन अपुरे पडत असल्याचे कलावंतांचे म्हणणे आहे.

ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या योगदानाचा विचार करून शासनाने त्यांच्या मानधनात वाढ करावी. केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी वृद्ध साहित्यिक व कलावंतांकडून केली जात आहे.

नितीन शेरखाने यांच्यासह सांजातीलकार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत नितीन शेरखाने यांच्यासह सांजा गावातील असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या घडामोडीमुळे धाराशिव शहर आणि परिसरातील राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे.

विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रांत कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या पक्षप्रवेशामुळे स्थानिक पातळीवर पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे.

या पक्षप्रवेशात नितीन शेरखाने, गफूर भाई शेख, शंकर सूर्यवंशी, मालोजी भैय्या सूर्यवंशी, रवी रोहिदास, संजय रोहिदास धावारे, प्रतीक शेरखाने, प्रेम शेरखाने, पद्माकर शेरखाने यांच्यासह आदिंनी प्रवेश केला

या कार्यक्रमाला प्रदीप मुंडे, पप्पू मुंडे, तुषार निंबाळकर, पृथ्वीराज चिलवंत, भीमा जाधव, लिंबराज डुकरे, गणेश जगताप, विकास जाधव, रवी कोरे, कृष्णा मुंडे, आदित्य हंबीरे, सह्याद्री राजेनिंबाळकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

धाराशिव जिल्ह्यात ५.९५ लाख पशुधन; उपलब्ध चारा डिसेंबरपर्यंतच!

दररोज २,३०६ मेट्रिक टन वैरणीची गरज; दुष्काळात पशुधन जगविण्याचे प्रशासनासमोर आव्हान

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

जिल्ह्यात सलग पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीबरोबरच पशुपालन व्यवसायावरही संकटाचे सावट आहे. जिल्ह्यात २१ व्या पशुगणनेनुसार एकूण ५ लाख ९५ हजार ८४४ पशुधन असून, त्यांच्यासाठी दररोज सुमारे २ हजार ३०६ मेट्रिक टन वैरणीची आवश्यकता आहे. सध्या उपलब्ध असलेला आणि आगामी काळात उपलब्ध होणारा एकूण १ लाख ८५ हजार ४०० मेट्रिक टन चारा डिसेंबर २०२६ पर्यंत पुरेल, असा अंदाज पशुसंवर्धन विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यापुढील काळात चारा उपलब्धतेचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

धाराशिव जिल्ह्यात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाला मोठे महत्त्व आहे. दूध उत्पादनातून मिळणारे नियमित उत्पन्न शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला आधार देते. शेळ्या-मेंढ्यांचे पालन हा अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. मात्र, दुष्काळामुळे हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने पशुधनाच्या पोषणाचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. जिल्ह्यात ५ लाख ९५ हजार पशुधन २१ व्या पशुगणनेनुसार (२०२५) जिल्ह्यात मोठ्या पशुधनाची संख्या ३ लाख २२ हजार ८०३, लहान पशुधनाची संख्या ४८ हजार २३३, तर शेळ्या व मेंढ्यांची संख्या २ लाख २४ हजार ८०८ आहे. अशा प्रकारे जिल्ह्यात एकूण ५ लाख ९५ हजार ८४४ पशुधन आहे. या पशुधनावर हजारो शेतकरी आणि पशुपालक कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. दररोज २,३०६ मेट्रिक टन चाऱ्याची गरज जिल्ह्यातील पशुधनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात चाऱ्याची आवश्यकता आहे.

त्यामध्ये मोठ्या पशुधनासाठी १ हजार ९३६.८२ मेट्रिक टन, लहान पशुधनासाठी १४४.७० मेट्रिक टन, तर शेळ्या व मेंढ्यांसाठी २२४.८ मेट्रिक टन वैरणीची गरज भासते. एकूण गरज लक्षात घेता, उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर आणि पर्यायी चारा निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे. पशुधनाचे महत्त्व केवळ दूध उत्पादनापुरते मर्यादित नाही.

शेतीच्या कामांसाठी बैलांचा उपयोग, शेणखताद्वारे जमिनीची सुपीकता वाढविणे, तसेच दूध संकलन, वाहतूक, दुग्धप्रक्रिया आणि पशुखाद्य विक्री यांसारख्या पूरक व्यवसायांनाही पशुपालनामुळे चालना मिळते. त्यामुळे चारा व्यवस्थापनाचा प्रश्न ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेला आहे. पर्यायी चारा निर्मितीवर भर आवश्यक



उपलब्ध चारा डिसेंबरपर्यंत पुरण्याचा अंदाज असला, तरी त्यानंतरची गरज लक्षात घेऊन आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध कडबा, वाळलेला चारा, उसाचे वाढे आणि अन्य पर्यायी चारा स्रोतांचा योग्य वापर करावा लागणार आहे. त्याचबरोबर पाण्याची उपलब्धता असलेल्या जमिनींवर चारा पिकांची लागवड, चारा साठवण आणि पशुधनाच्या गरजेनुसार वितरण यावर भर देणे गरजेचे आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संरक्षण करणे म्हणजे शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षण करणे होय. त्यामुळे चाऱ्याची उपलब्धता, पाणीपुरवठा आणि पर्यायी चारा निर्मिती यांचे प्रभावी नियोजन झाल्यास आगामी काळातील संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते.

चाऱ्याच्या टंचाईचा दूध उत्पादनाला फटका?

दुष्काळामुळे शेतीच्या उत्पन्नात घट झाली, तरी दूध उत्पादनातून मिळणारे उत्पन्न शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देते. मात्र, जनावरांना पुरेसा चारा आणि पाणी मिळाले नाही, तर त्यांच्या आरोग्यावर तसेच दूध उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे पशुपालकांच्या उत्पन्नावरही विपरीत परिणाम होऊ शकतो.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

युवकास मारहाण केल्याचा व्हिडिओ समोर येताच लातूर पोलिसांकडून तात्काळ दखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : सोशल मीडियावर अल्पवयीन मुलासंदर्भातील व्हिडिओ व्हायरल झाल्याचे निदर्शनास येताच लातूर पोलिसांनी तात्काळ दखल घेत पीडित मुलाचा शोध घेऊन व्हिडिओतील चार आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यापैकी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, उर्वरित तीन आरोपींच्या शोधासाठी तीन पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

सदर घटना जून महिन्यातील असून, याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सो, अपहरण, खंडणी, जिवे मारण्याचा प्रयत्न आदी गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल असून तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणात तातडीने कार्यवाही करण्यात आली आहे.

पीडित मुलगा अल्पवयीन असल्याने त्याची ओळख उघड होईल असा व्हिडिओ प्रसारित करणे टाळावे. असा व्हिडिओ कोणीही पुढे पाठवू नये किंवा सोशल मीडियावर व्हायरल करू नये. पीडित बालकाची ओळख व गोपनीयता जपण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे. पीडित अल्पवयीन बालकाची ओळख उघड करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे.

विविध वृत्त.....

शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २० ऑक्टोबर रोजी बंद राहणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ ऑक्टोबर : दसरा सणानिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ रोजी बंद राहील.

तसेच बुधवार, २१ ऑक्टोबर २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे.

हेल्मेटअभावी २७ वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर न केल्यामुळे होणाऱ्या अपघातांमध्ये जीवितहानी होण्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अशातच पहाटे लातूर-बार्शी रोडवरील रामेगाव फाट्याजवळ झालेल्या अपघातात २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. रामहरी बालाजी पाटील (वय २७ वर्षे, रा. गिरवलकर नगर, लातूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. हेल्मेटचा वापर केला असता,

तर डोक्याला झालेली गंभीर दुखापत टाळता येऊन त्याचे प्राण वाचण्याची शक्यता होती. या घटनेमुळे दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पहाटे सुमारे २.३० ते ३ वाजण्याच्या दरम्यान रामहरी बालाजी पाटील हे एमएच-२४-सीसी-३११८ क्रमांकाच्या प्रवास करत असताना लातूर-बार्शी रोडवरील रामेगाव फाट्याजवळ अपघात झाला. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. सदर घटना गातेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या घटनेचा अधिक तपास गातेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस करत आहेत.

'अमृत दुर्गोत्सव २०२६' उपक्रमात सहभागी व्हा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ : महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास, महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांचा समृद्ध वारसा आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने 'अमृत दुर्गोत्सव २०२६' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी ऐतिहासिक वारशाशी जोडले जावे, गड-किल्ल्यांचा इतिहास जाणून घ्यावा तसेच पुढील पिढीमध्ये इतिहासाविषयी अभिमान आणि संवर्धनाची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी, युवकांनी आणि नागरिकांनी आपल्या घरी, शाळेत किंवा परिसरात महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार कराव्यात. प्रतिकृती तयार केल्यानंतर त्यांची छायाचित्रे काढून अमृत दुर्गोत्सवच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करावीत.

उसाच्या शेतात गांजाची लागवड

४ लाख ३१ हजारांचा ८ किलो ६२० ग्रॅम गांजा जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर जिल्ह्यात अंमली पदार्थांची अवैध लागवड, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने शिरूर अनंतपाळ पोलिसांनी कारवाई करून उसाच्या शेतात लागवड केलेला गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ८ किलो ६२० ग्रॅम गांजा, अंदाजे ४ लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८.२८ वाजण्याच्या सुमारास मौजे सांगवी - घुगी येथील शेत शिवारातील सर्वे क्रमांक १२ मधील मधुकर यांच्या उसाच्या शेतात गांजाची लागवड केल्याची बाब निदर्शनास आली. याप्रकरणी मनोज वय ३८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. सांगवी-घुगी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर. याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. सदर ठिकाणाहून गांजाची झाडे उपटून दोन पोत्यांमध्ये भरलेला एकूण ८ किलो ६२० ग्रॅम गांजा मिळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ४ लाख ३१ हजार रुपये आहे. याप्रकरणी पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३३/२०२६, कलम ८ (क), २०(ब) (ळळ) (ब), एनडीपीएस अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची फिर्याद परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी अक्षय जाधव यांनी दिली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रायबोळे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी अक्षय जाधव यांच्या नेतृत्वातील पथकाने केली आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

किल्लारीत तिर्रट जुगारावर पोलिसांचा छापा

३ लाख ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या नेतृत्वाखाली औसा व किल्लारी पोलिसांच्या संयुक्त पथकाने किल्लारी येथे तिर्रट जुगारावर छापा टाकला. या कारवाईत जुगार खेळणारे व खेळविणारे एकूण १३ जण आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख रक्कम, १५ मोबाईल फोन, तीन मोटारसायकली आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख ४६ हजार २० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत किल्लारी शहराजवळील विरळ वस्तीतील एका पत्र्याच्या शेडमध्ये पैशांची बाजी लावून तिर्रट नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली औसा व किल्लारी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी दोन टेबलांवर जुगार खेळला जात असल्याचे आढळून आले.

या कारवाईत १२ प्रौढ व्यक्ती आणि एक विधिसंघर्षग्रस्त बालक असे एकूण १३ जण मिळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ४६ हजार २० रुपये रोख रक्कम, १५ मोबाईल फोन, तीन मोटारसायकली तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. या प्रकरणी किल्लारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मरडे करीत आहेत.सदरची कारवाई औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या नेतृत्वाखाली औसा व किल्लारी पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि अंमलदारांच्या संयुक्त पथकाने केली.लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई सुरू असून, अशा गैरकृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे.

कौटुंबिक दांडिया महोत्सवात ' डफी ' चित्रपटाच्या पोश्टरचे उत्साहपूर्ण वातावरणांत लोकार्पण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : चित्रपट सृष्टीत आपल्या परिश्रमाच्या बळावर स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यात कमालीचे यशस्वी ठरलेल्या निर्माता - दिग्दर्शक विशाल गिरी यांच्या आगामी मराठी चित्रपट ' डफी' चे पोश्टर लॉन्चिंग , लोकार्पण लातुरात नुकत्याच पार पडलेल्या कौटुंबिक दांडिया महोत्सवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.यावेळी सिनेअभिनेते तानाजी गलगुंडे , भूषण मंजुळे, अभिनेत्री चैत्राली चव्हाण,अर्चना सूर्यवंशी यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



या चित्रपटाच्या पोश्टरच्या लॉन्चिंग सोहळ्यास चित्रपटातील सर्व प्रमुख कलाकारांनी आवर्जून उपस्थिती नोंदवली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अभिनेता तानाजी गलगुंडे यांनी ग्रामीण कथेवर आधारित असलेला एक कौटुंबिक चित्रपट असल्याचे मत व्यक्त केले. आजच्या रसिक प्रेक्षकांना हवा असलेला सर्व मनोरंजक मसालाही या चित्रपटात योग्य प्रमाणात उपयोगात आणलेला आहे. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रित बसून या चित्रपटाचा आनंद घेऊ शकतात. प्रत्येक कलाकाराने आपआपल्या वाट्याला आलेली भूमिका चोख आणि प्रामाणिकपणे निभावण्याची काम केले आहे, ही बाब चित्रपट पाहिल्यानंतर रसिकांच्या लक्षात येईल. निर्माता दिग्दर्शक विशाल गिरी यांच्यासोबत काम करताना आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे तानाजी गलगुंडे यांनी बोलून दाखवले. अभिनेते भूषण मंजुळे यांनी यावेळी बोलताना एक वास्तववादी विषयावरील हा चित्रपट आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर आधारित हा चित्रपट असल्याचे प्रेक्षकांना वाटणार असून याचित्रपटात आपण तानाजी गलगुंडे यांच्या वडिलांची भूमिका साकारली आहे. कौटुंबिक भट्टीतील चित्रपटांना प्रेक्षक प्राधान्याने पसंत करत असतात. त्यामुळे हा चित्रपट नक्कीच सर्व भाषिक प्रेक्षकांना आवडेल असा विश

्वासही मंजुळे यांनी व्यक्त केला. तसेच आपल्या मराठवाड्यातील ग्रामीण भागातही मराठी चित्रपटाची निर्मिती होऊ शकते, विशाल गिरी यांनी या माध्यमातून दाखवून दिल्याचे त्यांनी नमूद केले. अभिनेत्री चैत्राली चव्हाणने हा चित्रपट करताना आपल्याला दिग्दर्शक विशाल गिरी आणि सर्व सहकलाकारांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्याचे सांगितले.

हा चित्रपट प्रा. भास्कर बडे यांच्या ' आंजीमाय ' या ग्रामीण कथेवर अवलंबून आहे. या कथेबद्दलची वास्तव पार्श्वभूमी प्रा. बडे यांनी यावेळी उलगडून सांगितली. चित्रपटाचे निर्माता दिग्दर्शक विशाल गिरी यांनी या चित्रपटाच्या निर्मितीमागची संकल्पना विशद केली. या चित्रपटाचे चित्रीकरण लातूर - बीड जिल्ह्यात अवघ्या चौदा दिवसात पूर्ण करण्यात आले. चित्रीकरणादरम्यान चित्रपटातील कलाकारांनी आपल्याला उत्तम प्रकारे सहकार्य केले. काही उणीव असतील तरीही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून चित्रपट वेळेत पूर्ण व्हावा यासाठी सहकार्य केल्याचे गिरी म्हणाले. डफी चे चित्रीकरम बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील मांगेवाडी आणि परिसरात झाले आहे. काही चित्रीकरण लातूर तालुक्यातील खंडापूर येथेही कारण्यातआले. चित्रपटात लातूर जिल्ह्यातील अनेक नवोदित कलाकारांना संधी देण्यात आली आहे. आपण आपल्या चित्रपटात नवनवीन कलाकारांना संधी देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगून विशाल गिरी यांनी हा चित्रपट डिसेंबर महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले.

लातूर ग्रामीणमध्ये बेकायदेशीर सुतळी बॉम्ब निर्मितीच्या ठिकाणी पोलिसांचा छापा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर ग्रामीण परिसरातील ममदापूर येथे शेतात सुरू असलेल्या बेकायदेशीर सुतळी बॉम्ब निर्मितीच्या ठिकाणी लातूर पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात तयार सुतळी बॉम्ब, प्रक्रियेत असलेले बॉम्ब आणि निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले. ही कारवाई आज सोमवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. ममदापूर येथील चंद्रकांत धनवे यांच्या शेतातील रस्त्यालगत असलेल्या अंदाजे १५ बाय ५० फूट आकाराच्या पत्र्याच्या शेडमध्ये तसेच शेडलगतच्या मोकळ्या जागेत सुतळी बॉम्ब तयार करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांना आढळून आले.



घटनास्थळी मोठ्या प्रमाणात तयार सुतळी बॉम्ब, प्रक्रियेत असलेले सुतळी बॉम्ब, सुतळी, कागद, सल्फर तसेच बॉम्ब निर्मितीसाठी वापरण्यात येणारे अन्य साहित्य आढळून आले. यावेळी सहा महिला कामगार आणि मुकादम लिंबराज गणपती मोरे (वय ४२, रा. ममदापूर, ता. लातूर ग्रामीण) उपस्थित होते. प्राथमिक चौकशीत या कारखान्याचा मालक म्हणून आसिफ रसूल शेख (वय ३२, रा. ताजुद्दिन बाबा दर्गा रोड, आंबेडकर चौक, लातूर) यांचे नाव समोर आले आहे. सुतळी बॉम्ब निर्मितीसाठी आवश्यक परवान्याबाबत चौकशी केली असता, संबंधितांकडे परवाना उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी आवश्यक परवान्यांची पडताळणी आणि संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू आहे.

स्फोटक पदार्थ हाताळण्यासाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था, संरक्षक साधने आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना प्रथमदर्शनी अपुऱ्या असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांसह परिसरातील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता होती. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा, उपलब्ध साहित्याची मोजणी व जप्ती आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. स्फोटक पदार्थ अधिनियम, १८८४, स्फोटक पदार्थ नियम, २००८ तसेच तपासात निष्पन्न होणाऱ्या अन्य लागू कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र मायने (चाकूर) यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक रमेश चव्हाण (चाकूर पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश कुलकर्णी (उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, चाकूर), पोलीस कर्मचारी लक्ष्मण अर्दवाड, गणेश वनामी तसेच महिला पोलीस कर्मचारी पूनम शेटे आणि रूपाली भोसले यांच्या पथकाने ही कारवाई केली. परवान्याशिवाय स्फोटक पदार्थ किंवा फटाक्यांची निर्मिती, साठवणूक अथवा हाताळणी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या पोलीस ठाण्याला माहिती द्यावी. अशा धोकादायक आणि बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक, निवडणूक आयोगाच्या मनमानी विरोधात कॉग्रेसचे आंदोलन

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १९ ऑक्टोबर : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात महायुती सरकारला आलेले अपयश, शेतकऱ्यांची झालेली फसवणूक आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कथित पक्षपाती व मनमानी कारभाराविरोधात लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवारी निलंगा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश सहप्रभारी रेहाना चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानांतर्गत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठविला.



मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी सध्या गंभीर दुष्काळी परिस्थितीचा सामना करीत आहेत. पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. मात्र, राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना पाच हजाराची मदत जाहीर करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. एकीकडे शेतकरी संकटात असताना दुसरीकडे लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरही काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकविणे आणि नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे सांगत निवडणूक आयोगाच्या कथित मनमानी कारभाराविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला जाब विचारण्यासाठी आणि संविधानाने दिलेल्या लोकशाही अधिकारांच्या रक्षणासाठी काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात डॉ. स्मिताताई शहापूरकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, महिला जिल्हाध्यक्षा शिलाताई पाटील, डॉ अरविंद भातांब्रे, जिल्हा उपाध्यक्ष गंगासिंह कदम, मारोती पांडे, प्रभाकर बंडगर, सभापती फैजलखान कायमखानी, शाहीद पटेल, मानिक गायकवाड, नगरसेवक अजित नाईकवाडे, सुधीर लखनगावे, पं. स. सदस्य किरण पाटील, बालाजी आंधारे, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, आंबादास जाधव, विलास कांबळे, प्रा. सुरेंद्र धुमाळ, अनिल अग्रवाल, विठ्ठल पाटील, दिनकर बिरादार, बालाजी गोमसाळे, विलास लोभे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

जिल्हा काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

सिद्धेश्वर मंगल कार्यालयात रेहाना चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत एसआयआर, जिल्ह्यातील पक्ष संघटना, आगामी राजकीय वाटचाल, शेतकऱ्यांचे प्रश्न याबाबत आढावा घेण्यात आला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी खांद्याला खांदा लावून लढण्याचा निर्धार यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. पक्ष संघटना अधिक मजबूत करून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर आणि युवकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याचा संकल्पही करण्यात आला.